बापू — माझी आई

नवजीवन

मनुबहेन गांधी

बापू – माझी आई

लेखक
मनुबहेन गांधी

अनुवादक
ना. ग. जोशी

नवजीवन प्रकाशन मंदिर
अहमदाबाद

पंधरा रुपये

नवजीवन ट्रस्ट, १९४९

प्रथम आवृत्ति, प्रति ३,००० सप्टेंबर १९४९
अठरावी आवृत्ति, प्रति २५,०००, जून २०१५
एकूण प्रति: ९८,०००

गांधी जीवन-दर्शन परीक्षेसाठी हे पुस्तक
नवजीवन ट्रस्ट तर्फे सवलतीच्या दरात
प्रसिद्ध करण्यात आले आहे.

ISBN 978-81-7229-185-3

मुद्रक व प्रकाशक
जितेंद्र ठाकोरभाई देसाई
नवजीवन मुद्रणालय
अहमदाबाद - ३८० ०१४
फोन: ०७९-२७५४ ०६३५, २७५४ २६३४
फॅक्स: ०७९- २७५४ १३२९
Email: jitnavjivan10@gmail.com
Website: www.navajivantrust.org

प्रस्तावना

कुमारी मनुबहेन गांधींचे 'भावनगर समाचार'मध्ये प्रसिद्ध झालेले हे डझनभर लेख वाचकांना पसंत पडल्यावाचून राहणार नाहीत. मला वाटते, मनुबहेनचा लेख लिहिण्याचा हा पहिलाच प्रयत्न आहे. पू. बापूजींच्या स्वभावावर आणि कार्यावर त्याने चांगला प्रकाश पडतो या दृष्टीने त्यांचे महत्त्व आहे. १९४६ च्या अखेरीस नोआखाली येथे त्या पू. बापूजींपाशी गेल्या, तेव्हापासून त्यांनी तेथील घटनांची डायरीसुद्धा ठेवली आहे. त्यातील बराच भाग 'शिक्षण अने साहित्य' मध्ये क्रमश: येत आहे. नोआखालीचे मिशन सुरू झाले तेव्हापासून त्या बापूंच्या कायमच्या जोडीदार होत्या, त्यामुळे त्यांच्या टाचणांचे फारच महत्त्व आहे. आणि वाचकही या लिखाणाबद्दल त्यांना धन्यवाद दिल्यावाचून राहणार नाहीत.

पूज्य बापूजी स्वत:च मनुबहेनची 'आई' बनले होते. यावरून पुस्तकाच्या नावाचा खुलासा होईल.

मुंबई, २२-१-'४६ **किशोरलाल घ. मशरूवाला**

अनुक्रमणिका

	प्रस्तावना किशोरलाल मशरूवाला	
१.	बा व बापूंच्या मांडीवर	५
२.	बापू आई बनले	१०
३.	गीतेचे गुरू	१४
४.	खरे शिक्षण कोणते?	१७
५.	दोन खणांचा संग्रह	२१
६.	अनियमितता गुन्हा आहे	२५
७.	दगड विसरल्याचा धडा	२५
८.	लोभी बापू	२७
९.	सांगण्यापेक्षा करणे बरे	२८
१०.	खरा डॉक्टर रामच आहे	३०
११.	आजचा सुदिन ऊजवून घ्या	३३
१२.	"एकला चल रे"	३७
१३.	फुलहारांनी स्वागत	४३
१४.	कलकत्त्याचा चमत्कार	४६
१५.	बापूंचे जन्मदिवस	५१

१

बा व बापूंच्या मांडीवर

बापूजी पिता म्हणून अनेक मुलामुलींचे वडील बनले असतील, शिक्षक म्हणून अनेकांचे गुरुदेव बनले असतील, भाऊ म्हणून अनेक बहीणभावांचे दादा बनले असतील, अनेक पुतण्यांचे काका झाले असतील, अनेकांचे डॉक्टर, वैद्य किंवा परिचारकही झाले असतील, अनेकांचे मित्र असतील आणि अनेक दु:खी जनांचे वाली किंवा रक्षणकर्ते बापू असतील. खरोखर! राष्ट्रपिता म्हटले गेले तेव्हा त्यात सगळेच आले. पण माझ्यासाठी तर ते आई झाले होते. सामान्यपणे पाहता, पुरुष कधीही आई होऊ शकणार नाही, कारण जे मातृहृदय ईश्वराने स्त्रीला दिले आहे तसे प्रेमळ हृदय पुरुषांना दिले नाही. अशा प्रेमळ हृदयाचे बक्षीस ईश्वराने आईला–जन्मदात्रीलाच दिले आहे. पण नाही, ईश्वराच्या या प्रसादाचा वाटा मिळवणारे एक बापू निघाले.

आई जशी आपल्या मुलीला वाढवते तशी बापूंनी माझी निगा राखली. तसे पाहिले तर त्यांनी अनेक मुलींना वाढवले असेल. पण मला मात्र वारंवार असे सांगत की, "मी तुझी आई होऊन बसलो आहे ना? आतापर्यंत बाप तर पुष्कळांचा झालो आहे. पण आई मात्र आतापर्यंत तुझीच झालो."

पितादेखील अर्थातच आपल्या मुलाकडे सगळे लक्ष देतो. पण मुलीच्या घडवणुकीत आई जो हिस्सा उचलते त्यातच मुलीची खरी वाढ असते. अजूनसुद्धा आपण पुष्कळांच्या घरी ऐकतो की, जर मुलीला स्वयंपाक किंवा घरकाम येत नसेल तर सासू किंवा नणंद म्हणते, "आईने कुठे काय शिकवले आहे?" कोणी बापाला नाव नाही ठेवीत.

१९४२ मध्ये जेव्हा पू. कस्तुरबा तुरुंगात होत्या तेव्हा मी नागपूरच्या तुरुंगात होते. माझे वय त्यावेळी चौदाच वर्षांचे होते. माझी स्वत:ची आई मी बारा वर्षांची असताना या जगातून निघून गेली, पण तिच्या गोड आशीर्वादामुळे मला कस्तुरबांसारख्या आईची ऊब मिळाली आणि पू. कस्तुरबांनी मला

कधीच आईची उणीव भासू दिली नाही. सरकारने '४२च्या क्रांतीमध्ये बा-बापू दोघांना पकडले त्यामुळे या आईपासूनही मी वेगळी पडले. परंतु दैवयोगाने पुन्हा या अलौकिक मातेची सेवा करण्याची अलभ्य संधी माझ्या नऊ महिन्यांच्या नागपूरच्या तुरुंगातील वास्तव्यामुळे मिळाली. मला पुन्हा त्या प्रेमळ आईच्या मांडीवर डोके ठेवण्याचे भाग्य लाभले. मला स्वप्नातही वाटले नव्हते की आता या जन्मात पुन्हा पू. मोठ्या बांचे दर्शन घडेल. परंतु माणसाची श्रद्धा अगदीच विफल होत नाही.

पू. बापूजींच्या उपवासानंतर मोठ्या बांना वारंवार हृदयविकाराचे झटके येत असत. बा म्हणत की जर मनु येत असेल तर मला मनूच पाहिजे. त्याच सुमारास पू. बांना हृदयाचा एक मोठा झटका येऊन गेला. डॉ. गिल्डर व डॉक्टर सुशीलाबहन यांनाही एका मदतनीसाची जरूर होतीच. कारण त्यांना बा व बापू दोघांकडे लक्ष द्यावे लागे. त्यांनी नर्स म्हणून माझी मागणी केली. पण सरकार त्यावेळी विपरीत होते. माझ्यासारख्या अजाण मुलीला राजकारणाच्या गोष्टींत काय कळणार होते की, "गांधीजींकडे हिला नेण्यात जोखीम आहे" असे त्याला वाटावे! शेवटी राजाजी व देवदास गांधी यांच्या सर टोटनहाम व लॉर्ड लिनलिथगो यांच्याशी कितीतरी चर्चा झाल्या. अखेर राजाजी व देवदासकाकांना यश मिळाले आणि मला नागपूरच्या तुरुंगातून काढून आगाखान महालात आणले. यामुळे सगळ्यांनाच फार नवल वाटले होते. कित्येकांना तर असेही वाटले की आम्ही इतकी वर्षे बा-बापूजींजवळ राहणारे आणि आम्हाला ही संधी का नाही? ही लहानशी मुलगी काय बांची सेवा करू शकणार? अशा चर्चाही झाल्या. परंतु माझी लहानपणापासून ईश्वराएवढीच बा-बापूंवरही श्रद्धा होती आणि आहे.

माझे वडील पू. बापूजींच्या उपवासाच्या वेळी भेटायला गेले होते त्यावेळी पू. बांनी विचारले होते : "मनूची काय बातमी आहे?" माझ्या वडिलांनी सांगितले, "ती फार अशक्त झाली आहे आणि डोळे फार बिघडले आहेत." बस्स! तेव्हापासूनच जणू मातृहृदय आपल्या मुलीला पाहण्यासाठी तळमळत

असावे, अशा तऱ्हेने त्या माझी वाट पाहत होत्या. केविलवाण्या चेहऱ्याने मी जेव्हा आगाखान महालाच्या दरवाज्यांत पाऊल ठेवले तेव्हा पू. कस्तुरबा समोर येऊन उभ्या होत्या आणि तुरुंगाच्या नियमाप्रमाणे माझ्या सामानाची तेथील सुपरिंटेंडेंट झडती घेत असता त्या अधीर होऊन म्हणाल्या: "तुम्ही हिच्याजवळची किल्ली घ्या पण हिला लवकर आत येऊ द्या." अशा प्रेमळ मातेची रात्रंदिवस सतत सेवा करण्याचे अहोभाग्य तेरा महिने मला लाभले. निजणे, बसणे, खाणे, पिणे, सगळेच या आईच्या देखरेखीखाली पहिल्यासारखे चालू झाले, म्हणून माझे हृदय ईश्वराच्या या सगळ्या कृपेपुढे विनम्र झाले होते. कडक थंडी असली किंवा दमा उपटला आणि झोप आली नाही म्हणजे एक तर पू. बा माझ्या अंथरुणावर येऊन पडत किंवा मला उठवून आपल्या अंथरुणावर झोपवीत. "बाळ, तू सबंध दिवसाची दमली असशील. तू आपली खुशाल नीज. मला झोप येत नाही म्हणून तुला माझ्याजवळ झोपवीत आहे." आई जशी आपल्या सात-आठ महिन्याच्या किंवा वर्षाच्या मुलाला झोपवते तसे मला त्या थोपटून निजवीत.

अशा माझ्या प्रेमळ आईला ईश्वराने ता. २२ फेब्रुवारी १९४४ रोजी आमच्यापासून कायमचे दूर केले. मी त्या दिवशी पू. कस्तुरबांच्या डोक्याशी, डबडबणारी आसवे पुशीत जडवत् उभी राहून या जगाचा कायमचा निरोप घेणाऱ्या मोठ्या बां कडे पाहत राहिले होते. त्यांचे डोके बापूंच्या मांडीवर होते. रामधून व गीतेचा पवित्र ध्वनी चालला होता. मोठ्या बा सगळ्यांचा शेवटचा निरोप घेताना माफी मागत होत्या. मलाही म्हणाल्या, "बाळ, तू फार सेवा केली आहेस. ईश्वर तुला खूप सुखी ठेवो." बापूंना म्हणाल्या, "आता मी जाते." बापूंच्या डोळ्यातूनही टपकन् दोन अश्रू ओघळले. माझ्या पिताजींना म्हणाल्या, "मनूला आता घेऊन जा, शिकवा."

(माझ्या चौदा-पंधरा वर्षाच्या आयुष्यात मी जगातून माणूस कसे जाते ते किंवा शव अथवा पेटलेली चिता पाहिली असेल तर ती पहिल्यांदाच पू. कस्तुरबांची पाहिली! आणि जग म्हणते की किती भाग्यवान ही मुलगी जी

शेवटच्या क्षणापर्यंत बा-बापूंच्या जवळ राहिली! पण मी भाग्यवान की भाग्यहीन याविषयी माझे मन अजून संभ्रमात आहे.)

शेवटपर्यंत माझी काळजी वाहणाऱ्या अशा माझ्या आईला ईश्वराने का नेले? या विचारने क्षणभर ईश्वरावरची माझी श्रद्धा नाहीशी झाली. बापूंनी मला एक भजन म्हणायला सांगितले. मी माझ्या पोरकटपणाने बापूंना म्हटले, "माझ्या मोठ्या बांना ईश्वराने नेले. आता मी रामनामच नाही घेणार." अशा वेडेपणाचा पुष्कळ वेळा अद्‌भुत परिणाम घडतो याचा मला चांगला अनुभव आला.

त्याच रात्री पू. कस्तुरबांचा दहनविधी झाल्यानंतर आम्ही परत आल्याबरोबर बापूंनी पू. कस्तुरबांची कित्येक वर्षांची जुनी एकेक बांगडी (वर सोन्याची पट्टी मढवलेली), तुळसीमाळ, (वैष्णव लोकांत वापरतात तसली), आगवळ, त्यांनी वापरलेले कुंकू, त्यांच्या खडावा वगैरे माझ्या हातात ठेवून म्हटले, "घे, बाने तुझी खूप शिफारस केली आहे, म्हणून बांच्या या शेवटच्या वस्तूंची मालक तूच आहेस. मी तुलाच देण्याचा निश्चय केला आहे. भरताने जशा रामाच्या पादुका गादीवर ठेवून रामाच्या अनुपस्थितीत त्यांतून प्रेरणा मिळविली होती, तशीच तू बांच्या या वस्तूंमधून प्रेरणा मिळव. शिवाय बांचे सतीत्व कसे होते, याची साक्ष त्यांच्या काचेच्या पाच बांगड्या देतात. पाच खंडी लाकड्याच्या आगीमधून देखील त्या अभंग निघाल्या आहेत." (महाराष्ट्रात असा प्रघात आहे की, सौभाग्यवती स्त्री निवर्तली म्हणजे पाच काचेच्या बांगड्या, नारळ, तीळ, सातू, वगैरे शिधोरी तिच्या चितेवर ठेवतात. त्याप्रमाणे काचेच्या पाच हिरव्या बांगड्या बांधल्या होत्या. दुसऱ्या दिवशी राखेतून पाचही अखंड निघाल्या. त्यापैकी एक माझ्याजवळ त्या सतीमातेचा प्रसाद म्हणून राहिली आहे.

आता अशी चर्चा सुरू झाली की सरकार आता मला पू. बापूजींबरोबर राहू देणार नाही, कारण मला कस्तुरबांसाठीच ठेवले होते. मध्यप्रांताच्या सरकारने मला पुष्कळ महिन्यांपूर्वीच सोडून दिले होते. पण कस्तुरबांच्या

आजारात त्यांची सेवा करण्याची माझी इच्छा होती म्हणून माझी विनंती सरकारने मान्य करून मला राहण्याची परवानगी दिली होती. विधात्याने पू. मोठ्या बांपासून मला वेगळी काढली म्हणून पू. बापूंजीपासूनही मला वेगळे पडावे लागेल की काय? या विचाराने मी फारच दुःखी झाले होते. म्हणून डॉ. सुशीलाबहेन व बापूजी एक दोन वेळा तर माझ्या खाटेवर बसून मला थोपटून निजवून गेले. दुसऱ्या दिवशी बापूजींनी मौन असताना सकाळी चार वाजता मला पुढील चिठ्ठी लिहिली:

चि. मनुडी,

तुला नीट झोप आली ना? तुला आणि प्रभावतीला (जयप्रकाश नारायण यांच्या पत्नी) ठेवण्याविषयी लांबलचक पत्र काल लिहिले, पण रात्री विचारामुळे झोप आली नाही. शेवटी प्रकाश दिसला. अशी मागणी करता येत नाही. केली तर तुरुंग कसला? आपल्याला वियोग सहन केलाच पाहिजे. तू शहाणी आहेस. दुःख विसरून जा. तुला मोठी कामे करावयाची आहेत. रडणे सोड. आनंदाने राहा. बाहेर जाऊन जे शिकता येईल ते शीक. इतक्या सेवेनंतर तुझे कोणत्याही परिस्थितीत कल्याणच आहे. मला तुझी फारच चिंता वाटते. तुझ्यासारखी तूच आहेस. भोळी, सरळ आणि परोपकारी आहेस. सेवा हा तुझा धर्म बनला आहे. पण तू अजून अशिक्षित आहेस, मूर्खही खरी. तू अशिक्षित राहिलीस तर तू पश्चाताप करशील आणि मी जिवंत राहिलो तर मलाही पश्चाताप वाटेल. तुझ्यावाचून मला करमणार नाही. तरीही तुला आता माझ्याजवळ ठेवणे बरे वाटत नाही. कारण तो दोष आणि मोह होईल. मला निश्चित वाटते की तू आता राजकोटला जावेस. तेथे तुला नारायणदासांचा (राजकोट येथील राष्ट्रीय शाळेचे आचार्य) सत्संग लाभेल. तू तेथे एखादी उपयुक्त कला शिक; संगीतही शिकच. आणखी जे काय साधेल ते. कमीत कमी एक वर्ष जर तेथे काढशील तर तू पक्की तयार होशील; मग वाटल्यास कराचीला जा किंवा आणखी कुठे वाटेल तेथे जा." (मी बापूजींकडे जाण्यापूर्वी माझे वडील कराचीला होते आणि मी तेथे इंग्रजी पाचवीत होते.)

"कराचीला गुरुदयाळ मलीक आहेत खरे, पण ते आता तेथे राहणार नाहीत. म्हणून तेथे केवळ शिक्षणच मिळेल. तेही उपयोगी आहे. पुष्कळ मुलींमधे राहशील हेही चांगलेच. पण राजकोटला आहे ते कुठेच नाही. अधिक बोलू माझे मौन संपेल तेव्हा. तुझी आई मीच आहे ना? एवढे समज म्हणजे बस्स.

आगाखान महाल, पुणे बापूचे आशीर्वाद

ता. २७-२-'४४

हे पत्र तू सांभाळून ठेव.

पण नशीब चांगले म्हणून मी पू. बापूजींपासून दूर झालेच नाही आणि बापूंबरोबरच आगाखान महालांतून बाहेर आले.

२
बापू आई बनले

बस्स, त्या दिवसापासून बापूजींनी, आई आपल्या चौदा-पंधरा वर्षांच्या मुलीची काळजी घेते तशी माझी काळजी घ्यायला सुरुवात केली. तेरा-चौदा-पंधरा वर्षांची मुलगी साहजिकच आईच्या सहवासात राहते; किंवा तिला मातेचे सान्निध्य जास्त हवे असते. बापूनींही माझ्या खाण्यापिण्यात, पेहेरावात, माझ्या आजारात, कुठे जाण्या-येण्यात, माझ्या अभ्यासात, एवढेच काय पण मी दर आठवड्याला नीट न्हाते की नाही यांतसुद्धा बारकाईने लक्ष घालण्यास सुरुवात केली; व शेवटपर्यंत हे लक्ष घालणे असेच चालू राहिले.

बापूजी जेव्हा बंगालमध्ये गेले तेव्हा मी महुव्याला होते. पण माझ्या मागणीवरून नोआखालीहून त्यांनी मला तार करून आपल्याजवळ राहण्याची परवानगी दिली होती. मी बापूजींकडे गेले तेव्हा साडीच नेसत होते. अगदी उघड्या डोक्याने आजच्या फॅशनप्रमाणे राहण्याची मला विशेष सवय नाही, तरी नोआखालीस गेल्याबरोबर पू. बापूंना नमस्कार करताना माझ्या डोक्यावरून पदर खाली पडला; मला मात्र त्याचे भानही नव्हते, कारण त्यावेळी बापूजींच्या पुढ्यांत डोके ठेवले त्याबरोबर बापूंनी माझा कान ओढला

आणि म्हणाले, "काय, आलीस ना?" पण त्याच रात्री (१९-१२-'४६ गुरुवार, श्रीरामपूर) मला बापूजी म्हणाले, "गुजराती साडी शेठाण्यांचा कामाची; त्यांना झोपाळ्यावर झोके घ्यायचे असतात आणी मोटारीतून फिरायचे असते. शिवाय गुजराती साडी नेसायची आणि डोक्यावर पदर घ्यायचा नाही हे इतके ओंगळ दिसते की, डोळ्यांना पाहावेसे वाटत नाही. म्हणून तर बांसारख्या जुन्या काळच्या स्त्रिया जसे आपल्या पोषाखाकडे नेहेमी लक्ष देत, आणि डोके क्वचित उघडे पडले तर लगेच सावध होत तसे सावध राहिले पाहिजे." (इतके सगळे सांगितल्यावरही बापू मला हे सगळे का सांगत आहेत, याची मला जाणीव नव्हती.) "पण साडी नेसून तुला सावध राहता येणार नाही, म्हणून आगाखान महालात जसा तू पंजाबी पोषाख करीत होतीस तसाच, तुला जर येथे राहावयाचे असेल तर, वापरायला हवा. त्यातही डोके उघडे ठेवणे हे योग्य नव्हेच, पण तुझ्याएवढ्या मुलीला ते तितके अयोग्य किंवा ओंगळ दिसणार नाही जितके गुजराती साडी नेसून उघड्या डोक्याने फिरण्यामुळे दिसेल. मी तुझी आई झालो आहे ना? म्हणून मला तुला सगळे सांगायलाच हवे. उघड्या डोक्याने कशासाठी फिरतेस? आजकाल स्वत:चे केस लहान असोत की मोठे, पण लोकरीचे किंवा कृत्रिम केसांचे लांब लांब शेपटे वापरतात ते डोक्यावर पदर असला म्हणजे कसे दिसणार? मी स्त्रियांच्या मधे राहणारा माणूस आहे. स्त्रियांना पुढे आणण्यात मी पुढाकार घेतला आहे. शिवाय एकेकाळी मीच असा होतो की दक्षिण आफ्रिकेला गेलो तेव्हा बा पारशिणीसारखी दिसावी म्हणून तिला बूट-मोजे वापरायला शिकविले होते. तिला बिचारीला तर कसलेच भान नव्हते. पण ईश्वराने जसे केस दिले असतील तसेच ठेवण्यात जे सौंदर्य आहे ते कृत्रिम केसांत नाही. जसे हल्ली फुलदाणीमधे गुलाबाची कागदी फुले ठेवतात; पण गुलाबाची खरी फुले ठेवली तर डोळ्याना ती अधिक आवडतील." (या बोलण्यातून एकदम आध्यात्मिकतेकडे वळले.) "स्त्रियांमधे इतकी कृत्रिमता आली आहे म्हणूनच स्त्रियांवर अत्याचार होतात याविषयी माझ्या मनात शंका नाही. खोट्या

हिऱ्या-मोत्यांचे दागिने थोडा वेळ झगमगतील, पण शेवटी काळे पडतील. आणि सगळेच खोटे वापरण्याचा मोह वाढल्यामुळे जीवनही खोटे बनले आहे. जे पेहेरावात खोटे आहेत ते आतून शुद्ध असू शकतील असे मला वाटत नाही. त्यामुळेच स्त्रियांची अधोगती झाली आहे, विनाश झाला आहे. आज स्त्रियांच्या हातात हत्यार दिले तरी त्या सामना करू शकणार नाहीत. तर मग बिचाऱ्या, कोणी बलात्कार केला तर हत्याराशिवाय कसला सामना करणार? मूठभर हाडांच्या सीतेला, जिच्याजवळ काहीच साधन नव्हते अशा सीतेला, शक्तिसंपन्न अशा रावणाने मनात आणले असते तर एका चिमटीत चिरडून टाकली असती. तरी त्याचीही तिला हात लावण्याची हिंमत झाली नाही. कारण, सीतेचे पावित्र्य तसे होते. आज असे पावित्र्य कोठे आहे? जर कोणा स्त्रीवर बलात्कार झाला तर त्याला ती शरण जाईल. असे येथे घडले आहे. पुष्कळ गुंडांनी म्हटले की, तू शरण ये नाहीतर मारून टाकू. मरणाच्या भीतीने स्त्रिया शरण गेल्या. तेव्हा रामायणातील राम-सीता खरोखर झाली की नाही अशी शंका यावयाची आणि ती काल्पनिक आहे असे कदाचित वाटावयाचे. तरीसुद्धा ती कल्पना किती भव्य आणि उच्च आहे? शिवाय ती जीवनात गुंफून टाकता येण्यासारखी आहे. खरोखर, सीतेचे पात्र तर प्रत्येक स्त्रीने समजून घ्यावे असे आहे." (कृत्रिम गंगावने, दागिने आणि साड्यांवरून बापू गोष्ट कोठच्या कोठे घेऊन गेले!) ते पुढे म्हणाले: "आणि आजकाल नखे व हात रंगवायची फॅशन निघाली आहे तिचे नाव काय?" मला हसू आले. मी म्हटले: "बापूजी, तुम्ही नाव शिकून ठेवायला सांगितले असते तर शिकले असते. ओठ रंगवायच्या बाटलीला 'लिप स्टिक' म्हणतात, पण नखे रंगवण्याला काय वापरतात ते मला माहीत नाही."

"हो, हो, ती लिप्स्टिक लावून बिचारी ओठ रंगवते, नखे रंगवते. त्यामुळे आपण किती दुबळ्या, फिक्क्या झालो आहोत, हे पाहायला फुरसतच मिळत नाही. पूर्वीच्या बायकांचे असे रक्त असे की त्यांचे ओठ व नखे नैसर्गिकपणेच लालबुंद असत. पाश्चात्यांचे आपण आंधळे अनुकरण केले यांत दोष स्त्रियांचा

आणि पुरुषांचा आहेच, पण स्त्रिया माफीला योग्य नाहीतच. पाश्चात्यांची शिस्त, सभ्यता, विनय, विवेक, नियमितपणा, उद्योगपरायणता, नवे नवे शिकण्याची तळमळ, सगळ्यांबरोबर मिसळण्याची सवय, अशा किती तरी गोष्टी त्या लोकांपासून शिकण्यासारख्या आहेत. हे सर्व आपण फेकून दिले; आणि त्यांची पफ्-पावडर वगैरे अनेक फॅशना घेतल्या. म्हणूनच मी स्त्रियांना आरडून-ओरडून सांगत असतो की, स्त्रियाच हिंदुस्तानात स्वराज्य-सुराज्य आणू शकतील. कारण जशी गृहिणीवाचून घराची व्यवस्था अपुरी राहते तशीच स्त्रियांवाचून स्वराज्याची व्यवस्थासुद्धा अपुरीच राहील, असे मानणारा मी आहे. पण जेव्हा स्त्रिया पवित्र बनतील तेव्हाच हे होईल. या 'पवित्र' शब्दाचा माझा अर्थ तुला माहीत आहे? ज्याला स्वत:साठी 'पवित्र' शब्द वापरावयाचा असेल त्याच्या अंगी एवढे गुण असलेच पाहिजेत. या सर्व गुणांचे वर्णन म्हणा किंवा त्यासाठी शब्द म्हणा, 'पवित्र' या तीन अक्षरांत सर्व काही येऊन जाते. सभ्यपणा असला तरच पवित्रता येणे शक्य. मी गोषा-पडद्याचा कट्टर विरोधी आहे, पण मर्यादा ही असलीच पाहिजे. स्वच्छता–आतील (हृदयांतील) व बाहेरील–असली तरच पवित्रता येईल, नीटनेटकेपणा असला तरच पवित्रता येईल, सच्चेपणा असेल तरच पवित्रता येईल, दंभ किंवा अवडंबर नसेल तरच पवित्रता येईल, स्वाभिमान असेल तरच पवित्रता येईल आणि सेवेची कळकळ असेल तरच पवित्रता येईल. असे अनेक अर्थ पवित्रतेचे आहेत. जेथे पवित्रता आहे तेथे ईश्वर आहे यात मुळीच शंका नाही. हे एक शस्त्र स्त्रियांपाशी आले म्हणजे तलवारीची जरूर नाही नि भाल्याचीही जरूर नाही. पण ही सर्व लोखंडी शस्त्रे वापरण्यापेक्षा किंवा त्यांची तालीम घेण्यापेक्षाही पवित्रतेच्या शस्त्राची तालीम फार कठीण आहे. तिचे रहस्य कळले तर मात्र ती अगदी सोपी आहे.

"पाहा, मी तुला एका साडीवरून एवढा मोठा धडा शिकवला! कारण मी तुझी आई बनलो आहे ना? तेव्हा तुझा शिक्षक, तुझा आजोबा किंवा बाप असला तरी मी तुझ्या आईची जबाबदारी अंगावर घेतली आहे, तेव्हा ती मला

पार पाडलीच पाहिजे. या धड्यांची परीक्षा तुला ते आपल्या जीवनात आचरण करून तर आणायची आहेतच. पण उद्या मला तुझ्या डायरीत लिहून दाखव, म्हणजे तू किती पचवले आहेस ते मला कळेल." (माझी डायरी बापूजी रोज तपाशीत आणि सही करून देत. रात्री साडेबाराला मला उठवून हे सर्व सांगण्याची सुरुवात केली तो थेट सव्वा वाजला.) "आता तू नीज. मला झोप येत नव्हती म्हणून तुला उठवली. मनात असा विचार आला की, या पोरीला येथे ठेवून घेण्यात मी जोखीम तर घेतलीच आहे; तेव्हा तिला सावध तरी करावी, म्हणून मी तुला उठवली. जा, आता झोप जा."

अशी ही माझी आई होती. अर्ध्या रात्री उठवून असे धडे शिकवीत असे.

ईश्वराने आता तर माझ्या तिन्ही आयांना माझ्यापासून नेले! कवि बोटादकर यांनी जननीविषयी म्हटले आहे की–

गंगानां नीर तो वधे घटे रे लोल,
सरखो अे प्रेमनो प्रवाह रे
जननीनी जोड सखी नहीं जडे रे लोल.

(गंगेचे पाणी कमीजास्त होते; पण प्रेमाचा प्रवाह सारखा वाहत असतो. जननीची जोड, सखे, कोठेही मिळणार नाही.)

खरोखर, या कडव्याचा मला प्रत्यय आला. शेवटच्या घटकेपर्यंत माझ्या प्रेमळ अशा तिन्ही मातांचे प्रेम कधीही कमी झालेच नाही!

३
गीतेचे गुरु

नोआखालीमधे बापूजींना इतकी सगळी कामे असूनही मला गीता शिकवण्यासाठी ते रोज किमान दहा मिनिटे तरी देत असत.

आगाखान महालात अंकगणित, बीजगणित, भूमिती, भूगोल, इतिहास, विज्ञान, संस्कृत वगैरे बापूजींपाशी शिकण्याचे सद्भाग्य मला लाभले होते; पण इंग्रजी स्वत: त्यांनी मला कधीही शिकवले नाही. ते आगाखान महालातले

इतर जोडीदार शिकवीत. प्रसंगाप्रसंगाने एकेक विषय वेळेच्या अभावी व पू. कस्तुरबांच्या आजारामुळे गळत चालला; तरी पण संस्कृत शिकवायचे बापूजींनी कधीही सोडले नाही. तेव्हा माझ्या जीवनात गीता शिकवण्याची सुरुवातच पू. बापूजींनी केली. इतर विषय शिकवण्याचा भार आमच्याबरोबर राहणाऱ्या डॉ. सुशीला नय्यर, डॉ. गिल्डर किंवा प्यारेलालजी यांनी आपणाकडे घेतला, पण "मनूला गीता मात्र मीच शिकवणार आहे," असे म्हणून गीतेचे गुरू बापूजी एकटेच राहिले. इतर विषयांचे पुष्कळ गुरू झाले, शाळेतही कित्येक गुरू झाले असतील आणि नंतरही अनेक झाले. परंतु छातीवर हात ठेवून मी एवढे नक्की म्हणू शकेन की, गीतेचे गुरू बापूच राहिले. मग त्यात कधीतरी इतरांची मदत घेतली असली तरी मुख्य गुरुदेव बापूच राहिले.

आगाखान महालात फक्त गीतेच्या शब्दाचे उच्चारण होऊ शकले. नोआखालीत पहिला दिवस तसाच जाऊ दिला. दुसऱ्या दिवशी बापू म्हणाले: "आता तू माझ्याजवळ आल्याला चोवीस तास होऊन गेले, तेव्हा आता जुनी झालीस; बोल, तुझा गीतेचा अभ्यास कोठवर आला आहे? येथे तुला फक्त माझे काम करायचे आहे असे नव्हे, तुला अभ्यासही करायचा आहे."

मी म्हटले: "जेलमधून सुटल्यावर मी माझा गीतेचा अभ्यास स्वत:च कधीतरी केला असेल; पण उच्चारशुद्धीसाठी किंवा अर्थ समजून घेण्यासाठी इतर कोणाला गुरू केले नाही. कारण माझी अशी इच्छा होती की बाकीच्या सगळ्या विषयांसाठी हजार गुरू झाले तर खुशाल होवोत, पण गीतेचे गुरू तुमच्यावाचून कोणालाही करायचे नाही. म्हणून मी स्वत:च खरेखोटे उच्चार किंवा अर्थ करीत असे, इतरांजवळ अभ्यास वाढवला नाही."

याचे बापूंना वाईट वाटले. ते म्हणाले: "या इच्छेत तुझा खोटा मोह आहे. चांगली गोष्ट शिकायला हजारो काय, लाखो गुरू करायला काही हरकत नाही. आणि एखादे लहान मूल असले तरी त्याच्यापासूनही आपण शिकावे. चांगली गोष्ट शिकण्यात शरम कुणाची? पण चुकले तेथून पुन: मोजूया. आता आपण

आजपासूनच गीता सुरू करून टाकू. आता उच्चाराकडे विशेष लक्ष देण्याची जरूर पडणार नाही; पण मी तुला गीतेचा अर्थ सांगितला नाही ही गोष्ट मला खुपते आहे. तू नेहमी गीतेचे पाच-पाच श्लोक लिहावयाचे." (मी रोज गीतेचे श्लोक लिहीत असे व कितीही काम असले तरी ते श्लोक बापूजी पाहत आणि चुका सुधारून खाली सही करीत.) "आणि त्यांचा अर्थ, संधी सोडवून करायचा आहे. तिसरा अध्याय यज्ञाचा आहे आणि गीता-अभ्यास हा सुद्धा यज्ञ आहे. पण यज्ञ म्हणजे काय ते तुला थोडे सांगतो.

"यज्ञाविषयी भगवान सांगतात की, यज्ञ केल्यावाचून जो मनुष्य भोजन करतो तो चोरीचे खातो. हे फार महत्त्वाचे वचन आहे, कारण चोरीचे अन्न खाणे म्हणजे कच्चा पारा खाणे होय. कच्चा पारा पचत नाही. तो खाल्ला तर फुटून बाहेर निघतो. त्याचप्रमाणे चोरीचे अन्न खाल्ले तर ते पचत नाही. माणूस यज्ञावाचून घटकाभर राहिला तर तो चोर ठरतो. हा यज्ञ आपण सर्वांनी केला पाहिजे. आपल्या सुदैवाने ज्यांचे मन ठिकाणावर आहे त्याला यज्ञ करणे सोपे असते. त्याला नाही पैशांची जरूर, नाही बुद्धीची जरूर की नाही शिक्षणाची जरूर. यज्ञ म्हणजे हर प्रकारचे परोपकारी काम. ज्यांचे सबंध जीवन यज्ञमय असेल त्याच्याबद्दल असे म्हणता येईल की, तो चोरीचे अन्न खात नाही. म्हणून जो थोडासाही यज्ञ करील तो तेवढी कमी चोरी करतो असे म्हणता येईल. या तऱ्हेने विचार केला तर आपण सर्व थोडीफार चोरी करीतच असतो. जेव्हा स्वार्थमात्राचा त्याग करू तेव्हाच पूर्ण यज्ञ केला असे म्हणता येईल. स्वार्थाचा त्याग करणे म्हणजे मीपण-माझेपण सोडणे. हा माझा भाऊ आणि तो परका, ही माझी बहीण आणि ती परकी, असा भाव मनात राहता कामा नये. ज्याला आपले सर्वस्व कृष्णार्पण करता येईल त्यालाच असे करता येईल. असा मनुष्य जी सेवा करतो ती तो ईश्वराला मध्यस्थी ठेवून त्याचा सेवक म्हणून करतो आणि सेवेच्या भावनेने करतो. अशी माणसे नित्य सुखी राहतात, नित्य शांत राहतात, त्यांना सुख-दुःख सारखे असते. आपले शरीर, मन, बुद्धी जे काही असेल ते सर्व परमार्थासाठीच वापरतात. असा कडक यज्ञ

आपण सगळे करू शकत नाही. सगळ्या जगाची सेवा झाली तर करू या, अशी भावना मनात असावी. तेव्हा ज्यात सगळ्या जगाची सेवा येते व जे बहुतांश लोक करू शकतात असे कोणते कार्य आहे? असा विचार करता असे दिसते की कातण्याची क्रियाच यात मुख्य आहे. हे काम असंख्य माणसे परमार्थाच्या दृष्टीने करू शकतात. म्हणून ही मेहनत जगासाठी केली असे होईल आणि यामुळे असंख्य गरीबांचे पोटही भरते. आंधळ्यानांही हे काम करता येते, आणि प्रत्येक धाग्यागणिक रामनाम घेता येते.

"मी तुला गीतेचा अर्थ अशा तऱ्हेने समजावून देऊ इच्छितो. फक्त व्याकरणाच्या दृष्टीने नव्हे. हे मी एक उदाहरण दिले आणि यज्ञाचा खरा अर्थ समजावून सांगितला. यज्ञात सूतरहाट आहे आणि सूतरहाटात यज्ञ आहे."

४

खरे शिक्षण कोणते?

मी गेल्या वेळी लिहिले त्याप्रमाणे पू. बापूजी मला शिकवीत असत; तरीही कधी कधी मी बापूंना म्हणत असे की, तुम्ही मला शिकू दिले नाही. (कराचीहून मला आपल्याजवळ बोलावून घेतली होती.) मला परीक्षा द्यायच्या होत्या आणि त्यावेळी हल्लीच्या स्त्रियांसारखा थोडासा पदवीचा मोहसुद्धा होताच. ईश्वराचे माझ्यावर केवढे उपकार की त्याने मला त्या मोहातून सोडवले! आणि आज मी जर असे म्हटले की बी.ए., एम.ए. किंवा लंडनच्या सर्वात मोठ्या पदवीच्या परीक्षेतही मिळत नाहीत असे धडे या परम गुरूंनी मला देऊन माझे जीवन धन्य केले, तर मी अविनयी ठरणार नाही. मात्र हे सगळे शहाणपण आता सुचते आहे. पण जेव्हा बापू जिवंत होते तेव्हा मी त्यांना नेहमी ऐकवीत असे की मला तुम्ही शिकू दिले नाही.

बापू म्हणाले: "पण मला तुला शिकवून शहाणी करायचे आहे त्याचे काय?"

मी म्हटले: "पाहा, महादेवकाका एवढे शिकले म्हणूनच ना तुमचे मंत्री

होऊ शकले? इतरही जे मोठे झाले आहेत त्या सर्वांनी डिग्र्या मिळविल्या म्हणूनच ते वर चढले ना?"

बापू हसले आणि म्हणाले: "मोठे तेवढे खोटे, आणि 'डिग्री' पेक्षा 'उपाधी'* शब्द तू वापर, आणि 'उपाधी' ही खरोखर 'उपाधी' (पीडा)च आहे. मी बॅरिस्टर झालो त्याचा पश्चाताप मला आज होत आहे आणि खरे सांगायचे तर मी बॅरिस्टर झालो आहे, ही गोष्ट मला कधी आठवतही नाही.

"माझ्या या अनुभवामुळेच इतरांना या उपाधींतून सोडवावे म्हणतो. हो, भाषा या दृष्टीने सगळे आलेच पाहिजे. पण आजच्या युनिव्हर्सिटीत जी घोकंपट्टी चालू आहे, विद्यार्थी आपल्या रक्ताचे पाणी करीत आाहेत ते मला फार खुपते. आज आपल्या देशात विधायक कामाची गरज आहे. खेडेगावातून कितीतरी काम पडले आहे. विद्यार्थी आपल्या अभ्यासात जेवढा वेळ घालवतात तेवढाच त्यांनी एखाद्या रचनात्मक कामामध्ये घालवला तर देशाचा चेहराच बदलून जाईल. हो, या वाचनामागे ज्ञान मिळवण्याचा हेतू असला तर गोष्ट निराळी; मग ज्ञानासाठी वाचन आणि वाचनासाठी ज्ञान असा मंत्र असला पाहिजे. पण आजच्या विद्यार्थ्यांमध्ये परीक्षेसाठी वाचन आणि वाचनासाठी परीक्षा ही दृष्टी असते. आणि मग? मग त्या ज्ञानाचा उपयोग पैसे मिळवण्यासाठी केला जातो. कोणी डॉक्टर होतो, तर कोणी वकील होतो, तर कोणी इंजिनीयर होतो; आणि पास झाल्यावर नोकरीची शोधाशोध चालते आणि नोकरी म्हणजे हाडाची काडे करून शेवटी फलप्राप्तीच्या दृष्टीने शून्य. शेवटी आपल्या सर्व शिक्षणामार्गे मोठ्यात मोठी नोकरी कशी मिळेल हे ध्येय असते. याला अपवाद असतील. चाळीस कोटी लोकांत सगळेच असे करतात असे म्हणण्याचा माझा उद्देश नाही. पण शिक्षणामागचा आजचा हा एक शाश्वत नियम आहे. अमुक अभ्यास केला तरच सेवा करता येईल हा सगळा भ्रम आहे. मनुष्य कोठल्याही स्थितीत असला तरी त्याला सेवा करता येते. ईश्वराने माणसाच्या अंगी इतक्या शक्ती दिल्या आहेत की त्याला काहीही सबब काढता येऊ नये. नाहीतर मनुष्यजात अशी भयंकर आहे की करायचे

नसले की बहाणेच करीत बसेल. तुला दिसून येईल की, कोणाजवळ पैसा असेल, तर कोणाचे शरीर काम करीत असेल, कोणाची बुद्धी काम करीत असेल, तर कोणाची जीभ, हात, पाय, डोळे, कान, नाक सगळे सेवेच्या कामी येऊ शकते. ही मी तुला केवळ उदाहरणे दिली. म्हणून जी काही शक्ती असेल ती कृष्णार्पण करावी, म्हणजे आपणाला पुरे मार्क मिळतील. ज्याची शक्ती कोटी रुपये द्यायची आहे पण जो अर्ध कोटीच देईल त्याला पन्नास टक्के मिळतील. पण ज्याची शक्ती एक पैच द्यायची आहे आणि त्याने जर ती पैच दिली तर त्याला शंभरच्या शंभर गुण मिळतील.

"आपले वर्तन साफ असले पाहिजे. स्वार्थ बुद्धीने किंवा भीतीने माणसाने जर काही केले तर त्याला सेवा म्हणताच येणार नाही. जेथे ईश्वरार्पणवृत्ती आहे तेथे स्वार्थाला जागाच नाही. अशा रीतीने सेवा करणारा मनुष्य रोज आपल्या शक्तीत भर टाकीत असतो. उद्योग केला तरी तो सेवाभावाने. अशा रीतीने जो सेवापरायण राहतो त्याच्या हसण्यात, खाण्यात, पिण्यात, खेळण्यात आणि बोलण्यात–प्रत्येक क्रियेमध्ये सेवाभाव भरलेला असतो. त्यामुळे त्याच्या सर्व कार्यांत निर्दोषपणा असेल. अशा भक्तांना ईश्वराने जरूर त्या सर्व शक्ती दिलेल्या असतात. एवढ्यासाठीच हे श्लोक आहेत:

अनन्याश्चिंतयन्तो मां ये जना: पर्युपासते ।
तेषां नित्याभियुक्तानां योगक्षेमं वहाम्यहम् ।।
मच्चित्ता मद्गतप्राणा बोधयन्त: परस्परम् ।
कथयन्तश्च मां नित्यं तुष्यन्ति च रमन्ति च ।।
तेषां सततयुक्तानां भजतां प्रीतिपूर्वकम् ।
ददामि बुद्धियोगं तं येन मामुपयान्ति ते ।।

(अर्थ–जे लोक अनन्य भावाने माझे चिंतन करीत मला भजतात, अशा त्या नित्य माझ्यातच वसणाऱ्यांच्या योगक्षेमाची काळजी मी वाहतो. म्हणजे असे की, फळांची आशा माझ्याकडे सोपवून माझे काम करा. माझ्या ठायी चित्त लावणारे, मला प्राणार्पण करणारे, एकमेकांना बोध करीत, माझेच नित्य

कीर्तन करीत समाधानाने आनंदात असतात. अशा रीतीने माझ्याशी तन्मय होऊन राहणाऱ्यांना व मला प्रेमपूर्वक भजणाऱ्यांना मी ज्ञान देतो व त्यायोगे ते माझ्याप्रत येतात.)

"या श्लोकाचा तू विचार कर. त्यातील शेवटचा तर फारच महत्वाचा श्लोक आहे. त्यांत मोठ्या श्रद्धेचे काम तर आहेच. पण ईश्वराचे काम करताना तू मिळविलेल्या डिग्र्यांच्या तुला कोठे उपयोग करता येईल, हेच मी सांगू पाहात आहे. कदाचित तू शिकत असतीस आणि कॉलेजात जात असतीस तर तू कोठे असतीस? आज माझे चालले तर मी सगळ्याच कॉलेजियन मुलांमुलींना या दंगलीत आणून टाकीन. खरोखर, आपल्या विद्यार्थ्यांच्या मनांतून डिग्रीचा मोह निघून गेला तर आज जगाच्या नकाशात जो हिंदुस्तान बिंदुमात्र आहे तो समुद्राएवढा झालेला तू पाहाशील.'अंथरूण पाहून पाय पसरावेत' ही सुंदर म्हण लहानशा कुटुंबासच लागू पडते असे नाही, मोठमोठ्या देशांनाही ती लागू पडते. जसा देश असेल, तशी त्याची रीतभात आणि त्याचे कामकाज असले पाहिजे. पण इंग्रजांचे करू नये त्या बाबतीत आपण अनुकरण करू लागलो म्हणजे आपले पतनच होणार. हंस कावळ्याच्या चालीने चालू लागला असता तर हंस मरूनच गेला असता; पण हंस आपल्याच चालीने चालला आणि म्हणूनच त्याने जिंकले. ही गोष्ट तुला माहीत आहे ना? गोष्टीसुद्धा काही केवळ गोष्टीखातर असत नाहीत. त्यांच्यामधे केवढा थोरला उपदेश भरलेला असतो! हिंदुस्तानात अनेक वाईट चाली आहेत हे खर; तथापि हिंदुस्तान जर आपल्या चालीनेच चालला तर आपल्या कल्पनेपलीकडे ऊंच स्थान त्याला लाभेल. कारण हिंदुस्तानची संस्कृती समृद्ध आहे. मी तुला जसजशी गीता समजावून सांगत जाईन तसतसे नवेनवे अर्थ निघतच जातील. पण आज एवढे पचवलेस तरी बस्स आहे. हे लिहून काढ. पण लिहायचे म्हणजे केवळ लिहिण्याखातर नव्हे, तर गीतेचा अर्थ अमलात आणण्याच्या दृष्टीने. आजचा सबंध पाठ गीतेवरच आधारलेला आहे."

मला शिकू दिले नाही, या माझ्या टोमण्यावरून हा सबंध पाठ दिला, याचे मूल्य मला आज सांगताच येत नाही. बापू तर असे दयाळू होते की त्यांच्यावर कोणी रागावले तर त्याचा तो राग ते मधपाणी समजून पिऊन टाकीत. अर्थात बापूंच्याजवळ अशी मोकळीक होती की, आपल्या मनात काही असले तरी ते संकोच न करता सांगावे. बालबुद्धीमुळे मी बापूंसमोर केवढा उद्धटपणा केला होता त्याची जाणीव मला आज होत आहे, ही किती दुर्दैवाची गोष्ट! पुत्र कुपुत्र होऊ शकतो, पण माता कुमाता होत नाही.

हे अद्‌भुत पाठ देण्यामागे कोणता संकेत असेल तो देव जाणे. पण मी असे मानते की, मला वेळ झाला नाही तर आपल्या कामांपैकी काही कामे आग्रहाने मला सोडायला लावूनही डायरीत लिहवून घेतल्यावाचून ते राहत नसत. जणू काय त्यांच्या मनात होते की, एका वर्षानंतर आपण निघून जाऊ! हे भविष्य त्यांच्या डोळ्यापुढे असलेच. माझ्यापुरती तरी ही टिप्पणे म्हणजे त्यांचे मृत्युपत्रच ठरले!

**'डिग्री' साठी 'पदवी' या अर्थाचा संस्कृत-गुजराती समानार्थी शब्द. याचा अर्थ पीडा किंवा झेंगट असाही होतो.* - अनु.

५

दोन खणांचा परिग्रह

इ.स. १९४७ च्या ३० मार्चला पू. बापूजींना, नोआखाली-बिहारच्या यज्ञात उडी मारल्यानंतर प्रथमच, लॉर्ड माउन्टबॅटनना भेटायला जायचा प्रसंग आला. व्हाइसरॉयनी बापूजींना विमानाने भेटायला बोलावले होते. पण "ज्या वाहनात कोट्यवधी गरिबांना प्रवास करता येत नाही त्यात मला कसे बसता येईल?" असे म्हणून त्यांनी त्याला नकार दिला. आणि "आगगाडीतही मला माझे काम उत्तम तऱ्हेने पार पाडता येते तेव्हा मी आगगाडीतूनच येईन," असे कळवले.

उष्मा असह्य होता. चोवीस तासांचा रस्ता होता. शिवाय प्रत्येक स्टेशनावर या परम पित्याचे दर्शन घेण्यासाठी हजारोंनी गर्दी होत असे. तरीही कोठल्याही त्रासाची त्यांना कोठे पर्वा होती? त्यांनी मला बोलावून म्हटले:

"हे बघ, या यज्ञात तू एकटीच माझ्याबरोबर आहेस. दिल्लीला मी प्रथमच चाललो आहे. नोआखालीला जाताना मी तर असा निश्चयच केला होता की, तेथेच 'करावे अथवा मरावे' आणि म्हणून बरोबरच्या कार्यकर्त्यांना मोकळे केले पण तुला या माझ्या यज्ञात भागीदार व्हायला मी परवानगी दिली. तू बरोबरच राहिलीस म्हणून नोआखालीत सर्वांना सोडून आलो. तसेच येथे बिहारमध्येही केले. बाकी देवप्रकाश, हुन्नर (एक मुसलमान गृहस्थ) वगैरे आहेत ते व मृदुलाबहेन राहतील. मृदुलाबहेन माझ्या वतीने सर्व काही सांभाळील व काम करील. पण तुला सोडून कसे जाता येणार? तुझीही तशी इच्छा नसणार तेव्हा तुला माझ्याबरोबर नेणे भाग आहे. कमीत कमी सामान आणि लहानात लहान तिसऱ्या वर्गाचा डबा पसंत करायचा. पण बघ, यात तुझी खूप कसोटी आहे हं."

मी सामान तर कमीत कमी घेतले. पण प्रत्येक स्टेशनावर पू. बापूजींच्या दर्शनार्थ आलेल्यांची इतकी गर्दी होणार की घटकाभरही त्यांना आराम मिळणार नाही. शिवार हरिजनफंडही मला मोजावा लागेल नि त्या सगळ्याचा आवाज होईल. असा विचार करून मी दोन खणांचा डबा पसंत केला. एकात सामान ठेवून घेतले व दुसऱ्यात पू. बापूजींची निजण्याबसण्याची सोय केली.

पटण्याहून दिल्लीला जाणारी गाडी सकाळी ९.३० वाजता निघते. बापूजी व मी ९.२५ ला स्टेशनवर आलो. लोकांची गर्दी असह्य होती. पण आम्ही आत चढलो. बापूजी एकेका मिनिटाचा सदुपयोग करणारे, तेव्हा पाच मिनिटात त्यांनी हरिजनफंड गोळा केला. साडेनऊ वाजता गाडी निघाली. उन्हाळ्याच्या दिवसात बापूजी दुपारचे जेवण १० वाजता घेत.

मी दुसऱ्या खणात जाऊन सामान उघडून पू. बापूजींसाठी खायचे तयार करायला गेले. थोड्या वेळाने पू. बापूजींच्या खणात आले. बापूजी लिहिण्यात

गुंतले होते. मला त्यांनी विचारले: "कोठे होतीस?" मी म्हटले, "इथे खायचे तयार करीत होते." त्यांनी मला खिडकीतून बाहेर नजर करून पाहायला सांगितले. मलाही जराशी जाणीव झाली की आपले काहीतरी चुकले असावे. मी बाहेर पाहिले तो लोक लोंबकळत होते. मला धक्का बसला:

"या दुसऱ्या खणासाठी तू सांगितले होतेस?"

मी म्हणाले: "होय, बापूजी, मी येथेच सगळे काम केले–स्टोव्हवर दूध गरम केले, भांडी साफ केली, तर त्यामुळे आपणाला त्रास होईल असे वाटून मी दुसऱ्या खणाबद्दल सांगितले."

"किती लंगडा बचाव हा? आंधळे प्रेम ते याचे नाव. तुला माहीत आहे की मला त्रास होऊ नये म्हणून विमानाखेरीज आणखी स्पेशल ट्रेनबद्दलही सांगितले होते. एका स्पेशलसाठी किती गाड्या थांबवाव्या लागतील आणि किती हजारांचा खर्च होईल? ते मला कसे खपेल? मी तर लोभी आहे ना. तू आज एक खण जास्त मागितलास, पण सलून मागितला असतास तरी मिळाला असता. पण ते तुला शोभले असते का? तेव्हा तू दुसरा खण घेतलास हे सलून मागितल्यासारखेच झाले. मला माहीत आहे की तू हे सर्व माझ्यावरील आत्यंतिक प्रेमाला वश होऊन करतेस. पण मला तर तुला उंच चढवायची आहे, खाली पाडायची नाही, हे तुला समजले पाहिजे, आणि हे समजले असेल तर मी तुला सांगत आहे नि तुझ्या डोळ्यातून पाणी वाहत आहे ते वाहता कामा नये. आता याचे प्रायश्चित्त हेच की, तू सगळे सामान येथे आण आणि पुढचे स्टेशन आले म्हणजे स्टेशनमास्तरांना माझ्यापाशी बोलाव."

मी तर थरथर कापत होते. सामान तर फिरविले पण मला पू. बापूजींची चिंता वाटत होती की आता कसे होणार? पुष्कळ वेळा अशा लहान चुका दुसऱ्यांच्या असल्या तरी त्या ते स्वत:च्याच मानतात आणि एखाद वेळचे जेवणही सोडतात. याची मोठी काळजी मला वाटत होती.

आणखी आगगाडीत लिहिणे, वाचणे, मातीच्या घड्या ठेवणे, कातणे,

मला शिकवणे वगेरे सगळीच कामे! जेवढे घरात बसून चालायचे तेवढेच आगगाडीत प्रवासातही चालू असायचे!

शेवटी स्टेशन आले. स्टेशनमास्तरांना बोलावून आणले. बापूजींनी त्यांना माझा पराक्रम सांगितला: "ही पोर माझी नात आहे, पण बिचारी भोळीभाबडी आहे. अजून मला कदाचित् ओळखले नसेल, म्हणूनच हे दोन खण तिने पसंत केले. त्यात तिचा दोष नाही. दोष माझाच. मी दिलेले शिक्षण तेवढे अपुरे असेल ना? आता मी आणि तिने दोघांनींही प्रायश्चित्त घेतले पाहिजे. म्हणून हा खण रिकामा करून ठेवला आहे. त्याचा उपयोग जे पॅसेंजर लोंबकळत आहेत त्यांना बसवण्यासाठी करा. असे केले तरच माझे दु:ख हलके होईल."

स्टेशनमास्तरांनी खूप विनवणी केली, पण बापूजी कोठचे ऐकायला? स्टेशनमास्तरांनी इतकेही म्हटले की, "मी या लोकांसाठी दुसरा डबा जोडतो."

बापूजी म्हणाले: "दुसरा डबा तर जोडायला हवाच, पण या खणाचाही उपयोग करून घ्या. जरूर नसतानाही अधिक वापरणे यात हिंसा आहे. मिळत्या सोयींचा दुरुपयोग करायला लावून तुम्ही या पोरीला बिघडवू पाहता का?" बिचारे स्टेशनमास्तर शरमिंदे झाले आणि त्यांना शेवटी बापूजींचे म्हणणे ऐकावे लागले.

ते समग्र हिंदुस्तानचे पिताजी होते. स्वत: सोयी उपभोगाव्या आणि आपल्या बालकांनी लोंबकळावे हे त्यांना कसे खपणार? तेव्हा लोंबकळणाऱ्या लोकांना जागा मिळाली आणि मला आयुष्यातला अमूल्य पाठ मिळाला की, मिळणाऱ्या सोयींचा कमीत कमी उपयोग करावा. तेवढा ठपका त्यावेळी कठीण वाटला खरा, पण काही हरकत नाही. आज जीवनात त्याची किंमत अमोल होऊन बसली आहे. अशा बारकाईच्या अहिंसापालनानेच त्यांनी आपले जीवन घडविले होते आणि त्यातून मला कितीही कमी ग्रहण करता आले असले तरीसुद्धा माझ्यासारखीला अशा घडणुकीचा लाभ मिळाला व तो जन्मभर माझ्या उपयोगी पडेल.

६
अनियमितपणा गुन्हा आहे

नोआखालीत पू. बापूजींची एका गावाकडून दुसऱ्या गावची पदयात्रा दररोज बरोबर सात वाजता सुरू होत असे. सातावर दोन मिनिटे झाली तरी बापूजींना फार वाईट वाटे. एकदा मला सामान बांधताना थोडा उशीर झाला, कारण त्या वस्तू अशा होत्या की बापूजी उठले म्हणजेच ठेवता याव्यात. त्या ठेवण्यात पाच मिनिटे गेली, तेव्हा बापूजी मला म्हणाले: "बघ बाहेर कीर्तनवाले आणि गावचे लोक केव्हाचे येऊन उभे आहेत नि तुला अजून अवकाश आहे. या पाचशे माणसांची पाच मिनिटे तू चोरलीस असे म्हटले पाहिजे. मला हे कसे चालेल? आता मी जातो नि तू मागाहून ये. एवढा वेळ गेला ते मला मुळीच आवडले नाही. मी निघतो आहे म्हणून असे मात्र समजू नकोस की तू रोज असा उशीर करावास आणि मागेहून यावेस. मी म्हातारा आहे आणि तू पोर आहेस, तेव्हा धावत मला रस्त्यात गाठशील असा विचार करून तू अर्थातच सुटू शकशील, पण तो गुन्हा होईल. म्हणून सगळे काम नेहमी नियमित आणि वक्तशीर झालेच पाहिजे आणि अमुक माणसाला अमुक वेळ ठरवून सांगितले की मी सात वाजता बाहेर निघेनच, म्हणजे मग सातावर दोन सेकंदही गेले तरी ते मला खुपेल."

७
दगड विसरल्याचा धडा

नोआखालीत नारायणपुर नावाचे एक गाव आहे. तेथे रोजच्याप्रमाणे बापू सात वाजता पोचले. एका गरीब विणकराकडे आमचा मुक्काम होता. गावाला जाऊन पोहोचताक्षणी बापूजी प्रथम गरम पाण्याने पाय धुऊन घेत, मग थोडे फार आपले लिहिण्याचे वगैरे काम करीत. तेवढ्या वेळात मी बापूजींच्या मालीश व स्नानाची व्यवस्था करून ठेवीत असे. या क्रमाप्रमाणे मी सर्व केले.

बापूजी नेहमी आंघोळीच्या वेळी साबण न वापरता एक खडबडीत दगड वापरीत. हा दगड मी अगोदरच्या गावी विसरून आले, हे बापूजींच्या सगळ्या वस्तू स्नानाच्या खोलीत ठेवल्या तेव्हा माझ्या लक्षात आले. मी बापूजींना म्हटले: "बापूजी, मी अंग घसण्याचा दगड कोठेतरी विसरून आले. कदाचित् काल विणकरांच्या घरी राहून गेला असावा. आता मी काय करू?"

बापूजींनी थोडा वेळ विचार केला; मग मला म्हणाले: "तू चूक तर केलीसच. पण माझी तरी अशी इच्छा आहे की तो दगड तू स्वत: जाऊन शोधून आणावास. निर्मळबाबूंना सांग की माझ्यासाठी खायचे तयार करा; पण दगड शोधायला तूच एकटी जा आणि एकदा असे केलेस म्हणजे दुसऱ्या वेळी लक्षात राहील."

मी भीत भीत विचारले: "या गावात एवढे स्वयंसेवक आहेत. त्यापैकी कोणाला बरोबर घेऊन जाऊ?"

बापूंनी प्रश्न टाकला: "का?"

याचे उत्तर मी देऊ शकले नाही. नोआखालीत नारळी नि पोफळींची अशी दाट वने आहेत की नवख्या माणसाची वाटच चुकावी. शिवाय जातीय दंग्यांचे दिवस. त्या रस्त्यावर मुसलमानांचीच घरे आणि रस्ता वैराण उजाड. एकटीने कसे जावे? पण गुन्हा केला तेव्हा गेल्यावाचून सुटका नव्हती. मी "का?" ते उत्तर न देताच थोडीसी चिडून चालू लागले. मनात असेही येऊ लागले की, कोठून कोणी गुंड आले नि त्रास देऊ लागले तर? पण रामनाम घेत चालू लागले. ज्या रस्त्याने आम्ही आलो त्या रस्त्यावरील पावले पाहत पाहत चालले.

ते विणकरांचे घर कसेबसे सापडले तर खरे. विणकारच्या घरी फक्त एक म्हातारी राहत असे. त्या म्हातारीला काय माहीत की हा दगड इतका मोलाचा असेल? त्या बिचारीने दगड फेकून दिला होता. तो मी कसाबसा शोधून काढला. तो दगड सापडला तेव्हा माझ्या आनंदाला सीमा राहिली नाही. तो घेऊन झटपट नारायणपुराला जायला निघाले आणि साडेनवाला निघालेली मी

दुपारी एक वाजता परत आले. भूक तर कडकडून लागली होतीच. पण त्यापेक्षाही आजच्या एवढ्या चुकीमुळे बापूजींची थोडीशी सेवा अंतरली याचे दु:ख असह्य होते. म्हणून बापूजींच्या पुढ्यात दगड ठेवला तसे रडू कोसळले.

बापूजी मला म्हणाले: "आज तुझी परीक्षा झाली. ईश्वर जे करतो ते भल्यासाठीच. तू पहिल्या दिवशी माझ्यापाशी आलीस तेव्हा रात्री दोन वाजेपर्यंत तुला समजावून सांगितले होते की, माझ्या यज्ञात यायचे म्हणजे फार हिंमतीचे काम आहे; जर थोडीशी हिंमत खचली तर नापास करीन, तेव्हा अजूनही परत महुव्याला जायचे असेल तर जा; पण यात्रा सुरू झाल्यावर कोठेही जाता येणार नाही. म्हणून या दगडाच्या निमित्ताने तुझी पहिली परीक्षा झाली, त्यात तू उत्तीर्ण झालीस. मला त्यामुळे केवढा आनंद झालाय! हा दगड माझा पंचवीस वर्षांचा बाळगलेला मित्र आहे. तुरुंगात गेलो किंवा महालात गेलो तरी हा दगड बरोबरच फिरला आहे. जर तो मिळाला नसता तर मला व मीराबहेनला दु:ख झाले असते. शिवाय तुला एक धडा मिळाला की, दगड काय असे कितीतरी मिळतील, दुसरा शोधू, अशी बेपर्वाई करू नये; परंतु प्रत्येक उपयोगी वस्तूला जपायला शिकले पाहिजे."

मी म्हटले: "पण बापूजी, मनापासून जर रामनाम कधी घेतले असेल तर आजच घेतले. त्या उजाड रस्त्यावरून जात असताना हृदयाचा थरकाप होत होता."

बापूंना हसू आले आणि म्हणाले: "हो, जेव्हा संकट येऊन उभे राहते तेव्हाच ईश्वराची आठवण होते."

८
लोभी बापू

एकदा सकाळच्या प्यावयाच्या गरम पाण्याला जरा उशीर झाला. तेथली हवा फारच दमट असल्यामुळे चूल पेटत नव्हती. म्हणून साडीचा एका काठ फाडून मी रॉकेलात बुडवला. मागाहून बापूजींनी ते पाहिले. मी पेटवण्याच्या

तयारीत होते तेवढ्यात बापूजी मला म्हणाले: "तो काकडा दाखव पाहू."

मी काकडा दाखवला. बापूंनी काकडा उलगडला. एक नाडी करता येण्याएवढी लांब ती चिंधी होती. मला म्हणतात: "ही धुवून काढ आणि उन्हात वाळव. नाडी करता येईल एवढी चिंधी काकड्याला वापरायची? मी किती लोभी आहे त्याची तुला कल्पना आहे? गरम पाणी जरा उशीरा मिळाले तरी त्याची काळजी कशाला? एक तर हा काकडा कितीतरी रॉकेल प्याला अणि चिंधीवर माझे लक्ष नसते तर तीसुद्धा जळून गेली असती ना?"

मी म्हटले: "बापूजी, आता असा लोभ का म्हणून करावा?"

बापूजी थट्टेने म्हणाले: "तू आहेस उदार बापाची बेटी. पण मला थोडाच तुझ्यासारखे द्यायला बाप आहे?" एवढी थट्टा करून एकदम गंभीरपणे म्हणाले: "माझ्या थट्टेतही नेहमी गांभीर्य असते हे समजायला तू शिकलीस की मला पुरे आहे."

शेवटी ती चिंधी सुकली आणि तिचा त्यांनी नाडी म्हणून माझ्याकडून उपयोग करवला, आणि जवळच पडलेल्या गवताने चूल कशी पेटवावी हे शिकवले. देशाच्या एवढ्या मोठमोठ्या कामातही अशा लहानलहान गोष्टी शिकवण्यात बापूंना अत्यंत आनंद वाटत असे.

९
सांगण्यापेक्षा करणे बरे

बापूजी नेहमी स्वचछतेकडे फारच लक्ष देत. बाहेरची स्वच्छता तर बापूंना हवी असेच, पण आतली स्वच्छता हे त्यांच्या कार्याचे विशेष अंग असे. कधी एखादी वस्तू अस्वच्छ झाली तर समोरच्या माणसाला वारंवार सांगण्याऐवजी स्वत:च काम करून त्यायोगे ते दुसऱ्याला स्वच्छतेचा धडा देत.

नोआखालीतील रस्ते म्हणजे लहानशा पाऊलवाटाच होत्या. काही वाटा तर इतक्या अरुंद होत्या की मला मागे ठेवून बापूजींना एकट्यानांच त्या पायवाटेवरून चालता येई. तेव्हा माझा आधार न मिळाल्यामुळे दुसरीकडे

आधारासाठी त्यांना काठी वापरावी लागे. जिकडे तिकडे घाण असे हे बापूंना फारच खुपत असे. अनवाणी पायांनी त्यांना अशा घाणेरड्या रस्त्यावरून चालावे लागे.

एकदा आजूबाजूला मळ, थुंकी, कचरा वगैरे पडले होते ते सगळे जवळपासची पाने घेऊन ते स्वत: साफ करू लागले. मी काही वेळ थक्कच झाले. खेडेगावातील लोकही हे दृश्य पाहत होते.

मी बापूंना रागात विचारले: "बापूजी, आपण मला का बरं लाजवता? मी येथे मागे होते, तरीही मला न सांगता आपण का हे साफ केले?"

त्याचे उत्तर म्हणून बापूजी हसले व म्हणाले: "तुला कोठे माहीत आहे की मला अशी कामे करण्यात किती आनंद वाटतो ते? इतरांना सांगण्यापेक्षा स्वत: करून टाकावे यात मला किती कमी त्रास पडतो?"

मी म्हटले: "पण हे गावचे लोक पाहत आहेत."

बापूजी म्हणाले: "तुला आढळून येईल की उद्यापासून असे घाणेरडे रस्ते मला साफ करावे लागणार नाहीत. कारण यावरून सगळ्यांना धडा मिळेल, हे हलके काम नाही आणि त्यांनी तर माझ्यासाठीच साफ केले तर मला ते खुपेल."

मी म्हटले: "समजा फक्त उद्यापुरते साफ केले आणि मग जसे होते तसे घाणेरडे राहिले तर आपण काय कराल?"

तेव्हा उलट मलाच पकडली. मला म्हणाले: "मी तुला पाहायला पाठवीन आणि फिरून असा अस्वच्छ रस्ता असला तर मीच साफ करायला येईन. अस्वच्छातून स्वच्छ करणे हा तर माझा धंदा आहे."

आणि खरोखरच असे घडले. दुसऱ्या दिवशी मी पाहायला गेले तर रस्ता घाणेरडा होता. पण बापूंना सांगायला न जाता मीच साफ करून परत फिरले. बापूंना म्हटले: "मी रस्ता साफ करून आले. माझ्याबरोबर गावातील लोकही कामाला लागले होते. आणि आज तर त्यांनी वचन दिले आहे की, उद्यापासून तुम्ही येऊ नका, आम्ही स्वत:च साफ करू."

बापूजी म्हणाले: "तू माझे पुण्य कमावलेस. तो रस्ता मलाच साफ करायचा होता. पण असो. आता दोन गोष्टी होतील. एक तर स्वच्छता ठेवली जाईल आणि दुसरे म्हणजे लोकांनी दिलेले वचन पाळले तर तेवढा खरेपणा शिकतील." आणि तो रस्ता कायमचा साफ राहू लागला.

बापूंनी वरील प्रसंगाचा उल्लेख करून तीनचार दिवसांनी सांगितले: "आपल्या काठियावाडात रस्ते घाणेरडे करायची सगळ्यांना किती घाणेरडी सवय आहे? तेव्हा तू असे समजू नकोस की, रस्त्यांत किंवा गल्लीत परसाकडे बसायची किंवा थुंकायची सवय नोआखालीच्या लोकानांच आहे. हिंदुस्तानात अनेक ठिकाणी ही वाईट सवय आहे. त्यातून काठियावाडात खास आहे. ही सुधारणा करावी अशी लहानपणी मला उमेद होती. पण दैववशात् काठियावाडात मी फार वर्षे स्थिर राहू शकलो नाही. तुला माझा राग आला होता तो चुकीचा होता. कारण स्वत: खाल्ले तरच पोट भरते. तसाच स्वच्छतेविषयी माझ्या बाबतीत नियम आहे. स्वत:च सफाई करण्यात मला बेहद आनंद मिळतो."

१०
खरा डॉक्टर रामच आहे

नोआखालीत आमकी नावाचे एक खेडे आहे. तेथे बापूजींसाठी बकरीचे दूध मला कोठेही मिळाले नाही. आसपास पुष्कळ तपास केला. शेवटी दमून बापूजींजवळ गेले आणि त्यांना ही गोष्ट सांगितली. बापूजी मला म्हणाले : "त्यात काय आहे? नारळाच्या दुधाने बकरीच्या दूधाची गरज भागेल, आणि बकरीच्या तुपाऐवजी आपण नारळाचे ताजे तेल काढून खाऊ."

ते तयार करायची रीत बापूजींनी मला शिकवली आणि मी नारळाचे दूध व तेल तयार करून बापूजींना दिले. बापूजी बकरीचे दूध नेहमी आठ औंस घेत, त्याप्रमाणे नारळाचे दूध आठ औंस घेतले. पण ते दूध पचायला फार जड गेले आणि बापूजींना जुलाब होऊ लागले. त्यामुळे सायंकाळपर्यंत इतका

अशक्तपणा आला की बापूजी बाहेरून झोपडीच्या आत येत होते तेवढ्यात त्यांना घेरी आली.

बापूजींना जेव्हा जेव्हा चक्कर येई तेव्हा तेव्हा त्याची खूण म्हणून त्यांना खूप जांभया येऊ लागत, पुष्कळ घाम येई, हातपाय थंड पडू लागत आणि कधी कधी डोळे फिरवत. त्याप्रमाणे चक्कर यायला सुरुवात झाल्याची सूचना तर जांभया येऊ लागल्या तशी मला मिळालीच होती. पण माझ्या मनात असे आले की आता चारच फूट दूर अंथरूण आहे तेव्हा तेथपर्यंत खचित पोचता येईल. पण तो अदमास चुकीचा ठरला, आणि बापूजी माझ्या आधाराने चालत होते ते पडू लागले. मी सांभाळून डोके पकडून ठेवले आणि मोठ्याने हाक मारून निर्मळबाबूंना बोलावले. ते आले आणि आम्ही दोघांनी मिळून बापूजींना अंथरुणावर निजवले. मग मला वाटले, चला ना, डॉ. सुशीलाबहेन जवळच्या गावी आहेत त्यांना बोलावून घेऊ! कदाचित् काही जास्त कमी झाले तर मला मूर्खात काढतील. अशा हिशोबाने चिठ्ठी लिहायला बसले. ती रवाना करवण्यासाठी निर्मळबाबूंच्या हाती देते न देते तोच बापूजी जागे झाले व मला हाक मारून म्हणाले, "मनुडी!" (बापूजी जेव्हा लाडाने बोलावीत तेव्हा नेहमी मला 'मनुडी' म्हणत!) "तू मोठ्याने हाक मारून निर्मळबाबूंना बोलावलेस हे मला मुळीच आवडले नाही. पण तुझे वय पाहून तुला माफ करणे शक्य आहे. तरीपण अशा प्रसंगी तू मला काहीही न करता मनापासून रामनाम घेशील अशी मी आशा बागळतो. मी मनातून रामनाम घेतच होतो. पण तू निर्मळबाबूंना बोलावण्याऐवजी रामनाम घ्यायला सुरुवात केली असतीस तर मला फारच आवडले असते. आता तू याबद्दल सुशीलेला कळवू नकोस किंवा चिठ्ठी पाठवून बोलावू नकोस, कारण माझा खरा डॉक्टर रामच आहे. त्याला माझ्याकडून काम करून घ्यावयाचे असेल तोपर्यंत तो मला जगवील, नाहीतर घेऊन जाईल."

"सुशीलेला कळवू नकोस" हे शब्द कानावर पडले आणि मी क्षणभर कापू लागले. निर्मळबाबूंच्या हातातून चिठ्ठी हिसकावून घेतली. चिठ्ठी फाटून

गेली. बापूजींनी विचारले: "काय, तू लिहूनही टाकले होतेस ना?" मी लाचार होऊन हो म्हटले.

मला म्हणतात: "आज तुला आणि मला ईश्वराने वाचवले. आता ही चिठ्ठी वाचून सुशीलाबहेन आपले काम सोडून माझ्याजवळ धावत आली असती हे खरे; पण मला ते मुळीच आवडले नसते. तुझ्यावर नि माझ्या स्वत:वर मी चिडलो असतो. आज माझी कसोटी झाली. जर रामनामाचा मंत्र माझ्या हृदयात खोलवर उतरला तर मी कधीही आजारी पडून मरायचा नाही. हा नियम प्रत्येक माणसासाठी आहे, माझ्या एकट्यासाठी नव्हे. माणसाने चूक केली की तिचे फळ त्याला भोगावेच लागते, अशा भावनेने मी दु:ख सहन केले. माणसाच्या अखेरच्या श्वासापर्यंत रामाचे नामस्मरण चालू राहिले पाहिजे, पण ते पोपटाप्रमाणे नव्हे, तर मनापासून. जसे रामायणात आहे ना की जेव्हा सीतेने हनुमंताला माळ दिली तेव्हा त्याने ती तोडून फोडून टाकली, कारण तींत राम शब्द आहे की नाही ते त्याला पाहावयाचे होते. तो प्रसंग खरा असेल की नाही या भानगडीत आपण पडायची जरूर नाही. हनुमानासारखे पहाडी शरीर आपल्याला कदचित् करता येणार नाही, पण आत्मा खास पहाडी करता येईल. माणसाने मनात आणले तर तो वरील उदाहरण सिद्ध करून दाखवू शकेल. सिद्ध करता आले नाही तरीही सिद्ध करण्याचा प्रयत्न केला तरी बस्स आहे. गीतामाईने सांगितले आहे ना की, माणसाने प्रयत्न करावा, फल ईश्वराच्या हाती सोपवावे. अशा प्रकारे तू, मी आणि सर्वांनी प्रयत्न हा केलाच पाहिजे.

"आता तुला कळले असेल की माझ्या, तुझ्या किंवा कोणाही रोग्याच्या आजाराच्या बाबतीत एकच आहे. ते म्हणजे रामनाम आणि ते नाम जपणाऱ्यांनी अधिकारपरत्वे ज्या नियमांचे पालन करायला पाहिजे त्या नियमांचे पालन त्याने करावे. पण हे रामबाण औषध आपणा सर्वांना कोठे घेता येते?"...(माझ्या रोजच्या नोआखालीच्या डायरीतून.)

वरील प्रसंग ३० जानेवारी १९४७ रोजी घडला. बरोबर याच दिवशी एका वर्षापूर्वी!

रामनामावरील त्यांची अशी अचल श्रद्धा अखेरच्या क्षणापर्यंत रहिली. १९४७ च्या ३० जानेवारीला वरील प्रसंग घडला. आणि १९४८ च्या ३० जानेवारीला मला म्हणाले होते की, "शेवटच्या श्वासापर्यंत रामनाम जपले पाहिजे." अशा प्रकारे दोन वेळा तोंडून शेवटच्या श्वासात 'रा...म रा...म' माझ्याच कानाने ऐकण्याचा कठीण प्रसंग ओढवेल याची काय कल्पना! ईश्वराची करणी अशी गहन आहे.

११
'आजचा सुदिन उजवून घ्या'

जेव्हा पू. बापूजींनी आपल्या सर्व जोडीदारांना निरनिराळ्या गावांमध्ये ठेवले, तेव्हापासून बापूजींवरचा कामाचा बोजा फार वाढला होता. बापूजींच्या ऑफिसचे काम इतके असे की सहा माणसांना मोठ्या कष्टाने ते आटोपता येई. सहाची जागा एका बापूंना आणि निर्मळबाबूंना सांभाळावी लागे. निर्मळबाबू मदतीला होते, पण कामाच्या दृष्टीने ते नवखेच होते. शिवाय ते गृहस्थ बंगाली व इंग्रजीतूनच काम करू शकत. गुजराती, हिंदी, मराठी या सर्व भाषा त्यांना नव्याच होत्या. तेव्हा ते सर्व बापूजींना स्वत:लाच पाहावे लागे. त्याशिवाय लोकांना भेटायचे. रोजचे प्रार्थना-प्रवचन इंग्रजी हिंदी वर्तमानपत्रांत बरोबर देण्यासाठी ते स्वत:च पाहून घेत. कारण वर्तमानपत्रवाले पुष्कळ वेळा त्यांनी केलेले प्रवचन समर्पकपणे देऊ शकत नसत. म्हणून अर्थाचा अनर्थ होणार नाही हे ते स्वत:च पाहत आणि सर्वांत कठीण काम म्हणजे रोजच्या रोज सामान बांधायचे व एकही चीजवस्तू राहणार नाही इकडे लक्ष द्यायचे हे होते. अर्थातच ही सर्व जबाबदारी माझ्यावर होती, परंतु माझ्या वेळेवर तयार होण्याबद्दलची चिंता बापूजींना करावीच लागे. स्थिरपणे एके ठिकाणी राहायचे नाही. एकाच गावात पाचसात वर्षांनी जरी घर बदलण्याचा प्रसंग आला तरीही आपल्याला कितीतरी कंटाळा येतो

याचा सर्वांना स्वानुभव असेलच.

पुष्कळांना वाटेल की बापूजींचे कसले आले सामान? पण स्वत: कधी कोणाला भाररूप न होण्याची ते खास काळजी घेत. नेहमी आपल्या जरूरीच्या वस्तू बरोबरच बाळगीत. जरूरीच्या वस्तू म्हणजे केवळ लिहिण्यासाठी कागदपेन्सिलच नव्हे, तर सुईदोऱ्यापासून स्वयंपाकासाठी लागणारा कुकर, पोळपाट, लाटणे, तवा, सांडशी, चिमटा, दोन पातेल्या, चाकू, ताट, खाण्यासाठी दगडी किंवा मातीचा कटोरा, लाकडाचा (खाण्यासाठी) चमचा, ग्लास, आंघोळीला बादली, कमोड, साबण अशी प्रत्येक वस्तू बरोबर घ्यायची आम्हाला सूचनाच होती. नोआखालीत सगळ्या झोपड्या जळून गेलेल्या होत्या तेव्हा साधन मिळणार नाही म्हणूनच या वस्तू ठेवायच्या असे नव्हे, तर बिडलाजीसारख्यांच्या महालात असताना देखील त्यांना आपल्याच वस्तू वापरणे आवडत असे.

शिवाय ऑफिसच्या कामाची सामग्री निराळी असे. एक बगलथैली अशी असे की जिच्यातील कपटाही गेला तरी पू. बापूजींचे सर्व काम अडकून पडावे. या बगलथैलीत पू. बापूजींची गीता, रामायण, बायबल, कुरानेशरीफ, भजनावली याशिवाय व्हाइसरॉय किंवा जवाहरलालजी किंवा सरदार यांसारख्यांची पत्रे असत. टपालात आलेल्या पत्रात मागची बाजू लिहिणाऱ्याने कोरी सोडली असेल तर त्यांचा उपयोग करून कदाचित् उत्तरेही लिहिण्याची सुरुवात केलेली असे. ही बहुमोल पिशवी सांभाळण्याचे काम माझ्याकडे होते; आणि त्यातून काही गेले तरी त्याची जबाबदारी माझ्यावर होती. तरीही बापूजी म्हणत की, "काहीही गेले तरी तू आपली सुटून जाशील. मला थोडेच सुटता येणार आहे?" या वाक्यावरून बापूजींना त्या थैलीची किती काळजी वाटे ते समजून येईल.

आणि असेही चालायचे नाही की, चला, एका गावी एकच दिवस काढायचा आहे तेव्हा जेमतेम सामान असले तरी चालेल. बापू अचानक माझा व्यवस्थितपणा पाहायला येत. एका पत्रात लिहिले होते: "येथले काम कसे

आवरणार? माझ्या अहिंसेची कार्यक्षमता कोठे न किती? जेथे पाहावे तेथे आग आहे. ईश्वराची मोठी कृपा होय की तो मला निभावून घेत आहे. मोती जोखायचा बारीक काटा असतो; केसाचा शंभरावा भाग करून त्याचे वजन करायला त्याहूनही सूक्ष्म काटा पाहिजे; त्यापेक्षाही सूक्ष्म काट्यावर माझ्या सत्य व अहिंसेची परीक्षा चालली आहे. चारी बाजूला खोटेपणा आणि अतिशयोक्ती चाललेली आहे. सत्य शोधून सापडत नाही. अहिंसेच्या नावावर हिंसा होत आहे. धर्माच्या नावाने अधर्म होत आहे. पण माझ्या सत्य-अहिंसेची परीक्षा या सगळ्याच्या मधेच होऊ शकणार ना? आणि म्हणूनच ही परीक्षा द्यायला मी येथे बसलो आहे."

वरील लिखाणावरून नोआखालीच्या महायज्ञात पू. बापूजींची काय स्थिती होती, ते कळून येईल.

म्हणून हा सर्व कार्यभार आटोपायला बापूजी नोआखालीत नेहमी दोन वाजता उठत. मलाही उठवीत. एकतर अतिशय थंडी असे तेव्हा पांघरूणातून इतक्या लवकर पहाटेस उठायचा साहजिकच कंटाळा येई. पण बापूंना कधी कंटाळा येत नसे. एकदा मी बापूजींना थट्टेने म्हणाले: "बापूजी, जर आज रात्री घड्याळ पाहण्यात चूक झाली किंवा डोळेच उशीरा उघडले तर मी देवापुढे दिवा लावीन."

बापूजींना हसू आले आणि म्हणाले: "देव कुठे तुझ्यासारखा लालची आहे?"

खरोखरच देवालाही माझ्या दिव्याची काही पर्वा नसावी म्हणून दुसरे दिवशी दोन वाजले व डोक्यावर एक गोड थापट मारून "मनुडी, ऊठ. बघ, तुझ्या देवाला दिव्याची लालूच वाटली नाही ना?" असे म्हणून त्यांनी मला लावायला सांगितले. रोज रात्री कंदील मालवीत असत, म्हणून मी बापूजींना म्हटले, "बापूजी, आपण दहा किंवा अकरा वाजता निजतो आणि दोन वाजता उठतो, तर कंदील बारीक जळत राहिला म्हणून काय झाले?

बापूजी म्हणाले: "गोष्ट खरी आहे. पण मला रॉकेल कोण देणार? नाही

तू कमवून देत, नाही मी कमवीत! तुला रॉकेल जाळायचे सुचणारच, कारण तुझे वडील महुव्याला पैसे कमवीत आहेत. पण तुला माहीत आहे का की कंदील मालवण्याने माझी दोन कामे पार पडतात ते? एक तर कंदील तू लावलास म्हणजे तुझी झोप उडून जाते, आणि त्यामुळे मी काही लिहवू लागलो तर न पेंगता तू लिहू शकतेस; आणि शिवाय रॉकेलची बचत तर होतेच. तेव्हा माझे एक पंथ आणि दोन काज पार पडतात. परंतु 'एक पंथ आणि दो काज' याचा अर्थ तुला माहीत आहे का?

मी त्याचा अर्थ आपण सामान्यत: करतो तसा सांगितला. पण बापूजींनी त्याचा वेगळाच अर्थ करून दाखवला. ते म्हणाले:

'एक पंथ आणि दो काज' म्हणजे असा कोणता पंथ जो स्वीकारला असता नेहमी दोन कामे होतील? दो काज म्हणजे दोनच काज (कामे) असे नाही. दो काज म्हणजे अनेक किंवा शंभर काज (कामे). येथे (नोआखालीत) हजारो माणसांचा सर्वनाश झाला यावरून साहजिकच असा विचार येतो की आपण एक क्षणही फुकट दवडता कामा नये. शरीराला जरूर तेवढीच झोप, तेवढाच आहार, इत्यादी सर्व मर्यादित करावे. 'आजनो लहावो लीजीए रे काल कोणे दीठी छे?'* या भजनाप्रमाणे, आपणाला कुठे माहीत असते की एका क्षणानंतर आपले काय होणार आहे? मी तुला आता (रात्री दोन वाजता) हे समजावून सांगत आहे, आणि (मग) ईश्वराला जर मला किंवा तुला घेऊन जावयाचे असले तरी त्याने खुशाल न्यावे. ती दोरी ईश्वराने आपल्याच हातात ठेवली आहे.

"म्हणून हे कडवे अतिशय विचार करण्यासारखे आहे. तेव्हा असा सोनेरी पंथ कोणता जो स्वीकारल्याने सर्व अर्थ साधतील? हा पंथ केवळ परोपकाराचाच आहे. परोपकार म्हणजे शेजाऱ्याची सेवा, किंवा पाहिजे तर असे म्हणा की ईश्वरभक्ती. पण ईश्वरभक्ती केवळ टिळा लावल्याने किंवा माळा फिरवल्याने होत नाही. टिळा लावून माणसांना सुरे भोसकवले–जसे

* 'आजचा सुदिन उजवून घ्या, उद्याचे कोणी पाहिले आहे'

सध्या चाललेले आहे–तर तो दंभ होईल. पण नरसिंह भक्ताने म्हटले आहे की, 'भक्ती शीश तणुं साटुं' आहे. (भक्तीसाठी शिराचे मोल द्यावे लागते.) म्हणून तू हे समजून घे की कधी तुझ्याने शरीरद्वारा कोणावर उपकार करता आला नाही तर मनाने तरी तो करावा. उठता-बसता, खाता-पीता, खेळता-हसता मनाने सबंध जगाचे कल्याण चिंतावे आणि आपल्याला जी सेवा करता प्रसंग येईल ती करून मोकळे व्हावे. एवढे समजलीस तर पुष्कळ शिकलीस. बघ, मी तुला या लहानशा थट्टेतून धडा दिला. आपल्या म्हणीत असले गूढ अर्थ भरलेले आहेत."

या महान गुरूने रात्री दोन वाजताच्या निसर्गाच्या नीरव शांततेत, आणि शिवाय कोणी जागे न होईल अशा बेताने, हलक्या आवाजाने, जवळ जवळ वीस मिनिटांपर्यंत थट्टेतून गंभीर पाठ दिला.

१२
'एकला चल रे'

नोआखालीत झोपड्या चिखलामातीच्या आणि नारळीच्या झावळ्याच्या बनविलेल्या असतात. पक्की घरे कमी प्रमाणात आढळतात. जी थोडीफार पूर्वी होती तीही नोआखालीच्या हत्याकांडात भस्मीभूत झाली.

बापूजींचे मुख्य ठिकाण श्रीरामपुर नावाचे खेडेगाव होते. आम्हाला राहावयास मिळालेले घरही चिखलमातीचे व छप्पर नारळांच्या झावळ्यांचे होते. आपल्या बाजूलासुद्धा शेतकऱ्यांच्या अशा झोपड्या आढळतात, पण, (श्रीरामपुरच्या) झोपडीत काही विशेष प्रकारच्या सोयी सर्व सहकाऱ्यांनी केल्या होत्या. पण रोज एका गावाहून दुसऱ्या गावी जावे लागे. झोपड्या जळून खाक झालेल्या; शिवाय तेथील हवा सर्द, पाऊस यायचा तेव्हा मुसळधार, अशा स्थितीत झाडाखाली तरी रात्रीचा मुक्काम कसा करावयाचा? तेव्हा बापूजींनी यात्रा जरी पायी केली तरी राहणार कोठे, अशी चिंता सर्व सहकाऱ्यांना वाटत होती.

सबंध गांधीकॅम्पचे व्यवस्थापक सतीशबाबू यांना अधिकच चिंता वाटू लागली. पण ते फार विद्वान, बुद्धिमान आहेत; त्यांनी एक युक्ती शोधून काढली. एका जागेवरून दुसरीकडे नेता येण्यासारखी एक घडीची झोपडी त्यांनी तयार केली. या झोपडीतही अशी सोय केली की तींत खिडकी, दारे, दोन हलकी लाकडी बैठी बाके–बापूजींना व मला निजण्यासाठी–होती. जमिनीवर गवत व त्यावर चटई असली म्हणजे जमीन खडबडीत असली तरी हरकत नसे. याशिवाय तिच्या मागील बाजूला एक लहानशा बाथरूमसारखी काही योजना केली होती. अशी कलात्मक झोपडी त्यांनी तयार केली. सतीशबाबू एक झोपडी तयार करीत आहेत एवढे बापूजींना माहीत होते. परंतु त्यांनी जिला मागाहून 'महालासारखी झोपडी' असे उपनांव दिले अशी झोपडी तयार होत आहे, याची त्यांना कल्पना नव्हती.

यावेळी बापूजी श्रीरामपुरला राहत होते. पण तेथून दोन मैल अंतरावर असलेल्या चंडीपुर नावाच्या गावाहून त्यांची खरी यात्रा सुरू झाली. श्रीरामपुरहून चंडीपुरला गेले कारण त्या जवळच अतिशय हानी झालेले एक गाव होते. श्रीरामपुरहून या गावी जायचे तर सात ते आठ मैल चालावे लागणार. त्यामुळे बापूजींना फार श्रम पडतील. म्हणून एक रात्र चंडीपुरात राहिलो. या गावातही थोडेफार नुकसान झाले होते.

चंडीपुराहून बापूजींची नोआखालीची खरी यात्रा सुरू झाली. त्या दिवशी सकाळच्या यात्रेच्या प्रस्थानापूर्वी कित्येक स्त्रियांनी बापूजींना कुंकुमतिलक लावला, प्रार्थना केली. बापूजींनी मला सूचना देऊन ठेवली होती की 'वैष्णवजन तो तेने कहीए' हे भजन गावयाचे. पण त्यात एवढा फरक करायला सांगितला होता की, प्रत्येक कडव्याला एकएक वेळ 'ख्रिस्तीजन, पारसीजन, शीखजन, मुस्लिमजन, हरिना जन तो तेने कहीए जे पीड पराई जाणे रे,' याप्रमाणे गावयाचे. आणि या भजनात स्वत: आपला सूरही मिळवला. (रोज हे भजन गाइले जात नसे, प्रसंगोपात्त म्हटले जाई.)

पायताणेही बापूजींनी चंडीपुरात सोडली. कारण? "आपण आपल्या

हिंदू मंदिरात किंवा चर्चमधेही गेलो तरी पायताणे घालीत नाही, म्हणजे पवित्र जागी जायचे झाले तर आपण जोडे घालून जात नाही. मग मला तर दरिद्रनारायणाजवळ जायचे आहे. जिचे स्वजन लुटले गेले आहेत, जेथील निर्दोष स्त्रियांची व बालकांची कत्तल झाली आहे, जिला लाज झाकायलाही कपडा नाही, अशा भूमीवरून चालणे व अशा लोकांच्या भेटी घेणे ही मला पवित्र यात्रा वाटते. तेथे वाहणा कशा घालाव्यात?" हे शब्द बोलत असता बापूजींच्या हृदयाची स्थिती, आपण लोणी काढण्यासाठी ताक घुसळताना ताकाची स्थिती होते, तशी होती. आजही तो करुण आवाज कानांत घुमत आहे. बापूजींचे पाय म्हणजे आपल्या हातापेक्षाही अधिक मऊ. त्यांना काटे मोडले आणि भेगाही पडल्या.

बरोबर साडेसात वाजता एक हात माझ्या खांद्यावर ठेवून आणि दुसऱ्या हातात आपली नेहमीची कळकीची काठी घेऊन नारळी-पोफळीच्या वनातून कविवर्य रवीन्द्रनाथांचे 'एक्ला चल' हे भजन सर्वांत प्रथम गात गात यात्रा सुरू झाली.

यदि तोर डाक शुने केऊ ना आसे
तबे एक्ला चल रे ।
एक्ला चल, एक्ला चल,
एक्ला चल रे ।।
यदि केऊ कथा ना कय–
(ओरे ओरे ओ अभागा!)
यदि सबाइ थके मुख फिराये
सबाइ करे भय–
तबे पराण खुले,
ओ तुइ मुख फुटे तोर मनेर कथा,
एक्ला बल रे ।।
यदि सबाइ फिरे जाय–

(ओरे ओरे ओ अभागा!)
यदि गहन पथे याबार काले
केऊ फिरे ना चाय–
तबे पथेर काँटा
ओ तुइ रक्तमाखा चरणतले
एक्‌ला दल रे ।।
यदि आलो ना घरे–
(ओरे ओरे ओ अभागा!)
यदि झडबादले आंधार राते
दुयार देय घरे–
तबे बज्रानले
आपन बुकेर पांजर ज्वालिये निये
एक्‌ला चल रे ।।
यदि तोर डाक शुने केऊ ना आसे,
तबे एक्‌ला चल रे ।।
एक्‌ला चल, एक्‌ला चल,
एक्‌ला चल रे ।। ★

★ याचा मराठी पद्यानुवाद:
तुझी जर हाक ऐकून कोणी ना आले,
तर तू एकटा जाई रे!
एकटा जाई, एकटा जाई, एकटा जाई रे!
जरी कोणी शब्द ना बोले
(होरे होरे हे अभाग्या!)
कोणी शब्द ना बोले
जरी सर्व बसती मुखे फिरवूनी

सर्व भिउनी जाय
तरी हृदय खोलुनी ऽऽ
अरे तू मुक्त कंठे मनचे गाणे
एकटा गाई रे ।।१।।
जरी सर्व परत जाय;
(होरे होरे हे अभाग्या!)
सर्व परत जाय;
जरी गहन पथी जायच्या वेळी
सर्व दडुनी जाय
तरी मार्गी कांटे
तव रक्तगळत्या चरणि भाई
एकटा रगडि रे ।।२।।
जरी दिवा ना धरी कुणी
(होरे होरे हे अभाग्या!)
दिवा ना धरी कुणी
जरी घनघोर तुफानरात्री
दारे घे लावुनी
तरी वज्रानले
तू पेट घेऊनी एकटा जाई रे ।।
तुझी जर हाक ऐकून कोणी ना आले
तर तू एकटा जाई रे
एकटा जाई, एकटा जाई,
एकटा जाई रे ।।

हे भजन दररोज यात्रेस प्रयाण करण्यापूर्वी बंगालीतून आम्ही म्हणत असू आणि सबंध रस्ताभर मग एकामागून एक भजने, रामधून गात गात जात असू.

रस्त्यात जेथे कत्तल झाली असेल, हाडे पडली असतील, किंवा जळून गेलेल्या झोपड्या असतील त्या जागी बापू जात. बापूजी हे सर्व भग्न हृदयाने पाहत. या भजनांमुळेच त्यांना काय ती शांती मिळे.

साडेसात वाजता आम्ही निघालो ते साडेनऊ वाजता जिथे अतोनात नुकसान झाले होते त्या गावी पोचलो. या गावचे नाव मासीमपुर आणि त्या दिवशीची तारीख ७-१-४७.

मासीमपुरात बापूजींना राहता येईल असे एकही ठिकाण नव्हते, म्हणून ती घडीची झोपडी उभारली होती. बापूजींनी झोपडीत प्रवेश केला. वर, खाली, कानाकोपऱ्यांत सगळीकडे बारकाईने निरीक्षण केले, आणि मग चिखलाचे पाय धुऊन घेण्यासाठी एका फळीवर बसले. मी पाय धुवू लागले. थोडा वेळ बापूजी चूप राहिले; मग मला म्हणाले: "तू पाहिलस ना, सतीशबाबूंनी माझ्या या महालासाठी केवढी मेहनत घेतली आहे ती. शिवाय उचलणाऱ्याला एका जागेकडून दुसरीकडे घेऊन जायला सोपे जावे म्हणून झोपडीचे इतके लहान-लहान भाग तयार केले आहेत की लहान मुलालाही एकेक भाग उचलता यावा. असे त्यांनी माझ्यावर प्रेम केले आहे. पण अशा अमाप प्रेमाचा स्वार्थासाठी स्वीकार करावा? म्हणून हा 'महाल' आता दुसऱ्या कोठल्याही गावी नेऊ नये असे मी ठरवले आहे. त्याचा उपयोग एक लहान इस्पितळ बनवण्यासाठी व्हावा, अथवा अशाच कोणत्या तरी इतर कामासाठी ती वापरली जावी. मी जेथे जाईन तेथे जी जागा मिळेल तेथे आरामशीर पडून राहीन. नाहीतर शेवटी येथे झाडे कितीतरी आहेत. ती आपल्याला कुठे नको म्हणतात? त्यांच्या खाली आरामात राहू, झाले. रामाला जसे निभावून घ्यायचे असेल तसे निभावील, त्याची चिंता आपण कशाला करावी? ज्या ज्या गावी कार्यकर्ते गेले आहेत त्यांनाही मी सांगून टाकले आहे की ज्या गावात तुम्ही रहाल तेथल्याच माणसांनी तुम्हाला राहायला, जेवायला द्यावे–जसे कुटुंबातील माणसांना जेवूखाऊ घालतात त्याप्रमाणेच. कार्यकर्त्यांनी कुटुंबीय बनून राहिले पाहिजे. आम्ही कोणीतरी आहोत किंवा आम्ही तुमची सेवा

करायला आलो आहोत तेव्हा उपकारच करीत आहोत अशी भावना त्यांनी दाखवू नये; आणि तशी दाखवली तर त्याचा निभाव लागणार नाही. जर ते आजारी पडले तर जे औषधपाणी किंवा जे वैद्यहकीम गावामध्ये मिळतील त्यावरच किंवा पंचमहाभूतांमार्फत जे साहाय्य मिळेल तेवढ्यावर संतुष्ट राहावे. तोच नियम मलाही लागू आहे.

बापूजींनी दुसऱ्या दिवशी ती झोपडी बरोबर घेऊ दिली नाही. आम्ही ज्या गावी जात असू तेथे गावातीलच एखाद्या सामान्य घरात (झोपडीत) आमचा मुक्काम असे. त्यामुळे मोठा लाभ असा झाला की, हिंदू, मुसलमान, विणकर, कुंभार, हरिजन, न्हावी, शेतकरी, ब्राह्मण, वाणी, लोहार याप्रमाणे सर्व जातीच्या निरनिराळ्या प्रकारच्या घरातून आम्हास राहावयास मिळाले. एवढेच नव्हे, तर ज्या माणसांनी नोआखालीत कत्तल चालवली होती अशांच्या घरीही बापूजींचा मुक्काम घडला. त्यामुळे त्या लोकांची मनेही बदलली, आणि बापूजींना मुक्कामाला जागा देऊन आपल्या पापाचे प्रायश्चित घ्यावयाची संधी याच जन्मी मिळाली असेच जणू लोकांना वाटले असावे अशा प्रकारे सगळे आपापल्या घरांना व स्वत:ला पावन करून घेऊ लागले. बापुंनाही तेथे राहण्याचे आणि त्या सर्वांशी एकजीव होण्याचे जणू भाग्य लाभले असावे अशा प्रमाणे इतक्या दु:खातही त्यांच्या चेहऱ्यावर आनंद दिसू लागला.

कित्येक माणसे तर असे सुद्धा म्हणू लागली की नोआखालीत हत्याकांड झाले तर झाले; पण आमचा प्रदेश तरी पावन झाला ना!

१३
फुलाहारांनी स्वागत

एकदा नोआखालीतील एका गावात–देवीपुरात–तेथील कार्यकर्त्यांनी, लोकांनी बापूंच्या स्वागताची भव्य तयारी केली आणि त्या तयारीसाठी जवळजवळ १५० ते २०० रुपये खर्च केले (ही माहिती मागाहूनच कळली). पण रोजचा क्रम असा असे की, बापूजी ज्या गावी जात तेथे तेथे

विशेषत: स्त्रिया बापूंना तिलक लावून त्यांचे स्वागत करीत आणि फार तर नारळीच्या झावळ्यांनी निरनिराळ्या प्रकारे गावाला सजविण्यात तेई. याला बापूजी हरकत घेत नसत, कारण अशा सजावटीसाठी पैसा खर्चावा लागत नसे, फक्त मेहनतच लागे आणि अंगमेहनत करून काहीही केले तरी त्याला बापूजी कधी हरकत घेत नसत.

पण देवीपुरात मात्र चांदपुराहून आणलेली फुले आणि जरतार, रेशीम व तांबडे-पिवळे कागद वगैरे विकत आणून त्यांची सजावट केली होती. शिवाय तुपातेलाचे दिवे लावले होते. हे सर्व पाहून बापू क्षणभर एकदम गंभीर झाले. मग स्थायी कार्यकर्ते कोण आहेत, या गावची वस्ती किती, वगैरे माहिती काढायला मला सांगितले. ती मिळवून मी बापूंना म्हटले की, या गावात तीनशे हिंदू आणि दीडशे मुसलमान आहेत. हिंदूत ब्राह्मण, कायस्थ आणि क्षूद्र आहेत. बापूंनी तेथील जे मुख्य गृहस्थ होते त्यांना बोलावून खडसावले: "तुम्ही हे सगळे कोठून आणले?"

ते म्हणाले: "आपली पावले आमच्या येथे कोठून लागायला? म्हणून आम्ही सर्व हिंदूंनी एकत्र जमून प्रत्येकाने आठ-आठ आणे काढून–ज्याला अधिक देता येतील त्याने अधिक देऊन–तीनशे रुपये जमवले आणि फुले वगैरे आणली."

यामुळे बापू अधिक चिडले. "ही सगळी फुले आणि झगझगाट तुम्ही केला आहे तो सर्व क्षणभराने कोमेजून जाणार आहे. यावरून मला तर असेच वाटते की तुम्ही सगळे मला फसवीत आहात. माझ्या हिंमतीवर हा झगझगाट करून जातीयवादाला तुम्ही अधिकच चिथवीत आहात. तुम्हाला माहीत नाही का की मी हल्ली आगीच्या ज्वाळेत जळत आहे? इतके सगळे फुलांचे हार केले त्यापेक्षा तेवढेच सुताचे हार केले असते तर मला एवढे वाईट वाटले नसते, कारण त्या हारांनी शोभाही होते आणि त्याचे पुन्हा कापडही बनते. त्यामुळे काहीही फुकट जात नाही. मला वाटते, या गावात पैसा जास्त झाला आहे, नाहीतर अशा कठीण काळात असे हारतुरे आणायचे तुम्हाला सुचलेच नसते.

तुमच्या मनात प्रेम आहे हे शाबीत करायला जर हे हारतुरे आले असतील तर ते फार गैर होय. त्यामुळे प्रेम मुळीसुद्धा प्रगट होत नाही. तुमचे माझ्यावर प्रेम असेल तर मी सांगतो तेवढे करा म्हणजे मला बस्स आहे. तुमच्या एवढ्या मोठ्या प्रमाणावर कत्तली झाल्यानंतरही या फुलांप्रीत्यर्थ एवढा पैसा खर्च करायचे तुम्हाला कसे सुचले तेच मला कळत नाही. आणि त्यांतूनही तुम्ही काँग्रेसचे कार्यकर्ते आहात, सार्वजनिक कार्यकर्ते आहात. तुम्ही म्हणता त्याप्रमाणे तुम्ही माझी पुस्तके वाचली आहेत, तुम्ही एम.ए. पर्यंत शिकलेले आहात, तुरुंगात जाऊन आला आहात, हे खादीचे आखूड पंचे नेसता, आणि या सजावटीत विलायती गिरणीचे रेशीम, रिबन वगैरे तुम्ही वापरले आहे. हे सगळे माझ्या दृष्टीने दु:खप्रद आहे, एवढेच मला सांगायचे आहे. तुमच्यावरून मला माझ्या समस्त कार्यकर्त्यांबद्दल असा विचार येतो की, जे एकेकाळी देशसेवक म्हणून–प्रजेचे सेवक म्हणून–ओळखले जात तेच कार्यकर्ते लोकांनी त्यांना काही अधिकाराची जागा दिली तर असे हारतुरे द्यायच्या आणि घ्यायच्या मोहाला बळी तर नाही ना पडायचे? मला माझ्या डोळ्यापुढे हे दिसत आहे की, माझ्या सर्व कार्यकर्त्यांपैकी वाटेल त्याची परीक्षा घ्या, तो नेहमी साधाच आढळेल; त्याच्याजवळ हव्या तेवढ्या मोटारी, हवे तेवढे मोठे बंगले असले तरी तो आपले ध्येय कधीही सोडणार नाही, असे मला अजून छातीवर हात ठेवून सांगता येणार नाही. पण ठीक आहे. आजच्या प्रसंगाने मला जास्त सावध केले, जास्त जागरुक केले. मी यात तुम्हाला दोष देत नाही, तुम्ही जसे होतात तसे दिसलात. त्याला कोण काय करणार? पण मी कोठे आहे त्याची जाणीव ईश्वर मला करून देत आहे. अजून काय पाहायचे नशिबात असेल ते खरे."

बापूंना इतकी असह्य वेदना होईल याची बिचाऱ्या कार्यकर्त्यांना काय कल्पना? ते अगदी खजिल होऊन तेथून निघून गेले आणि सगळी शोभा-सजावट अर्ध्या तासात त्यांनी काढून टाकायला लावली. जेवढे कामाचे वाटले तेवढे घेतले. हारात जेवढा दोरा वापरला होता तो सर्व तोडून बापूंनी त्याचा

गुंडा बनवायला सांगितले. गुंडा खूप मोठा झाला, आणि तो शिवण्याच्या कामासाठी लोकांना दिला. सामान्यपणे आपण जे रीळ वापरतो तशी जवळजवळ पंधरा ते वीस रिळे होतील तेवढा दोरा निघाला. जर एवढा ओरडा बसला नसता तर दोरा कोठच्या कोठे फुकट गेला असता ना? त्यानंतर आम्ही ज्या ज्या गावी गेलो तेथे बापूंचे स्वागत हाताने कातलेल्या सुतांच्या हारांनीच होई. त्या प्रसंगानंतर नोआखालीत जवळजवळ पाचएक तागे बनतील एवढे सूत गोळा झाले. त्याचे कापड विणून घेऊन गरीबांना उपयोगाला देण्यात आले. असे गरीबांचे वाली बापू होते.

१४

कलकत्त्याचा चमत्कार

गेल्या वर्षी इ. स. १९४७मध्ये अनेक वर्षांच्या गुलामगिरीनंतर येणाऱ्या स्वातंत्र्याच्या वेळी आम्ही पू. बापूजींबरोबर कलकत्त्याला होतो.

१५ ऑगस्ट रोजी "कदाचित नोआखालीत भडका उडाला तर!" अशी भिती नोआखालीच्या लोकांना वाटत असल्यामुळे तेथे जाण्यासाठी, पू. बापूजी काश्मीरहून कलकत्त्याला गेले.

त्यावेळी कलकत्त्यात हिंदु-मुसलमानाचे दंगे चालू होते. त्यामुळे श्री. प्रफुल्ल घोष (तेथील मुख्य प्रधान) यांनी दोन दिवस थांबायला सांगितले आणि बापूजी थांबायला कबूल झाले. नंतर दंगे वाढले, तरीही बापूजींनी १५ तारखेला नोआखालीला जाऊन पोहाचावयाचेच असे ठरविले. आम्ही नेहेमीप्रमाणे तयार होऊन बसलो. तेवढ्यात शहीद सुहरावर्दीसाहेब आले. ते बापूंना म्हणाले: "आपण येथील आग विझवून नोआखालीस जा. येथे आग भडकली आहे ती आपल्यावाचून कोणाला विझवता येणार नाही."

बापू म्हणाले: "मला तरी एकट्याला नाहीच विझवता येणार. मी तुमचा मंत्री व्हायला तयार आहे. पण मी नोआखालीच्या लोकांना वचन दिले आहे, तेव्हा मला नोआखालीसच गेले पाहिजे. हो, पण त्याची जबाबदारी जर

तुम्ही स्वीकारीत असाल तर मी येथे राहायचा व आग विझवायचा शक्य तो प्रयत्न करायला तयार आहे. पण यात तुम्हाला माझ्याबरोबर रहावे लागेल आणि फकीर बनावे लागेल."

सुहरावर्दीसाहेबांनी थोडावेळ विचार करून म्हटले की, "नोआखालीस मी माणसे पाठवतो आणि शक्य तो प्रयत्न करतो."

बापू म्हणाले, "नुसता शक्य तो प्रयत्न नव्हे. पण जसे बिहारमध्ये काही झाले तर मी उपवास करून मरेन असे वचन दिले आहे, तसेच तेथे काही झाले तर मला नोआखालीसाठी उपवास करायचा हक्क मिळतो, याचा विचार करून मग जबाब द्या."

हे बोलणे ता. १३ ऑगस्ट रोजी झाले. बापूंची रीत तरी कशी? नोआखालीतील आतापर्यंतच्या हत्याकांडाची व यानंतर केव्हाही काही जरी झाले तर ते लोकच जबाबदार ठरावेत अशी मोठी जबाबदारी त्यांच्यावर बापूंनी टाकली तेव्हा शहीदसाहेब थोडे विचारात पडले. अर्थातच हे काम त्यांना कठीण नव्हते. कारण नोआखालीत जे जबाबदार मुसलमान होते, ज्यांच्यावर आरोप होते, ते सगळे सुटले होते, आणि शहीदसाहेबांचे म्हणणे ऐकतील असे होते. पण बापूंची काम करून घ्यायची रीत कशी आहे! ज्याने गुन्हा केला असेल त्याच्यावरच जबाबदारी टाकायची. कोणी नोकर असला आणि रोजच्या रोज चोरी करीत असला, तर सबंध मिळकतच त्याच्या हाती सोपविण्याची जोखीम पत्करणारे बापू होते. म्हणूनच आपला देश एवढा वर आला.

दुसऱ्या दिवशी शहीदसाहेब आणि त्यांची माणसे आली. सर्वांनी कबूल केले की, "आम्ही नोआखालीत संपूर्ण शांती राहील इकडे लक्ष देऊ. आणि यानंतर कधीही काही होऊ न देण्याची सावधगिरी ठेवू. पण तुम्ही येथेच राहा." झाले, बापूंचे काम कलकत्त्यात बसल्याबसल्या झाले. सर्व मुसलमान बंधूंनी नोआखालीत जाऊन तेथील हिंदूंना भिऊ नका म्हणून सांगितले; उलट शक्य ती मदत करू असे सांगितले. आणि बापूजींबरोबर राहण्याचे सुहरावर्दी

साहेबांनी मान्य केले ते येथवर की, खाणे, पिणे, निजणे, बसणे सगळे बापूजींबरोबरच. दोहोंपैकी कोणीही खाजगी भेटीही घ्यायच्या-द्यायच्या नाहीत, पत्रकेही बरोबर प्रसिद्ध करायची, असे ठरले. आणि १४ तारखेला दुपारी ज्या ठिकाणी मुसलमान जाऊ शकत नव्हते अशा स्थळी बेलिया घाटाजवळ हैदरी मेन्शनमध्ये बापू व ते राहावयास गेले.

घर इतके घाणेरडे होते की अशी गैरसोय आम्हाला नोआखालीच्या यात्रेतही भोगावी लागली नव्हती. एकच खोली व तेथे हजारो दर्शनार्थी येणार. बापूंना मुळीसुद्धा शांतता मिळत नव्हती. ज्या दिवशी आम्ही तेथे गेलो त्या दिवशी कित्येक तरुण बापूजींवर रुष्ट झाले होते. "तुम्ही हिंदूंचे दुश्मन आहात. येथे दोनचार दिवसात काही मुसलमान मेले एवढ्यात तुम्ही येथे आलात. मग आतापर्यंत कोठे होता?" बापूजी या सगळ्याच्या उत्तरादाखल हसले आणि तरुण मंडळींना शांत करीत म्हणाले: "तुम्ही सगळे तरुण आहात. माझ्यापुढे तर बच्चे आहात. तुम्हा सर्वांपेक्षा माझा सर्वांत धाकटा मुलगा देवदासही मोठा आहे. तुम्ही असे का समजत नाही की जन्माने हिंदू, कर्माने हिंदू असा मी काय हिंदूंचा शत्रू होणार आहे? नोआखालीत कोण गेले होते? आणि आजही जाणार होतो. पण मला तर तुमची मदत हवी आहे. मी एकटा काही करू शकणार नाही. रक्षक झालात तरी तुम्हीच होणार आणि भक्षक झालात तरी तुम्हीच होणार. तुम्ही भक्षक बनलात तर मी राजी होईन. मी तर आता म्हातारा झालो आहे, मला कुठे आता जगायचे आहे? पुष्कळ सेवा केली, येथे आलो तो केवळ तुमची समजूत घालता आल्यास घालावी म्हणून. मी दोहोंचाही सेवक आहे. मला सर्व धर्म समान आहे. असे पाहा, कायमच्या शांततेसाठी नोआखालीचे काम मी येथूनच केले की नाही?" (असे म्हणून वर लिहिलेल्या गोष्टी वर्णन करून सांगितल्या.)

ही बापूंची भविष्यवाणी होती की काय? "रक्षकही तुम्ही आणि भक्षकही तुम्ही." खरोखर हिंदूच अखेर भक्षक बनले!

तरुण मंडळी शांत झाली आणि नंतर तीच मंडळी गावात जाऊन शांततेचा

संदेश देऊ लागली, आणि स्वातंत्र्य येण्यापूर्वी अर्धा तास म्हणजे रात्री साडे अकरा वाजता ज्या कलकत्त्यात हिंदूला मुसलमान दिसला की तो त्याला ठार करी व मुसलमानाला हिंदू दिसला की तो त्याचा ताबडतोब निकाल लावी, त्याच कलकत्त्यात 'हिंदू-मुस्लिम भाई-भाई', 'हिंदू-मुस्लिम एक है', अशा गगनभेदी गर्जना करीत एकाच लॉरीत हिंदू व मुसलमान खांद्याला खांदा लावून बापूजींपाशी येऊ लागले आणि सबंध रात्रभर असे वातावरण राहिले. बापूजींना सबंध रात्र निजता आले नाही, कारण हिंदू-मुसलमान–केवळ पुरुष नव्हे तर स्त्रिया व मुलेही–खांद्याला खांदा लावून येत होते आणि या स्वातंत्र्य मिळवून देणाऱ्या पित्यांचे दर्शन घेऊन जणू अशी प्रार्थना करीत होते की, आमचे अपराध क्षमा करा, आता असे कधीही घडणार नाही. अशा तऱ्हेचे ते दृश्य होते. शहरोशहरी रोषणाई, विजेचे दिवे, मिरवणुका वगैरेचा धूमधडाका झाला होता. तथापि बापूजींनी जे कायमचे ऐक्य अर्ध्या तासाच्या आत उत्पन्न केले ते दृश्य त्या रोषणाईला खाली पाहायला लावणारे होते आणि त्या दिवसानंतर आजतागायत नोआखालीत असे काही अनिष्ट घडले नाही. (अर्थातच बापूजींचे कार्यकर्ते वगैरे तेथे होते व अजूनही आहेत. पण एकंदरीत शांतताच राहिली.)

आम्हाला बापूजींनी उपवास करायला सांगितले. मी म्हटले: "पण बापूजी, आज तर आपण आम्हाला मिठाई खाऊ घातली पाहिजे ना?"

बापूजी म्हणाले: "तुला माहीत आहे ना की, मी लग्न, जन्म व मृत्यू इत्यादी प्रसंगी उपवासच करायला सांगतो ते? चांगल्या प्रसंगी उपवासच करायला सांगतो. शिवाय आजपासून आपली जबाबदारी किती वाढली आहे? जसे एकादशीच्या दिवशी उपवास केला तर भक्तिकडे मन अधिक वळते तशीच जबाबदारीची जाणीवही आपल्याला आपण उपवास केला तरच यथायोग्य होईल. शिवाय, सूतरहाट हे तर स्वातंत्र्य देणारे हत्यार आहे. तेव्हा त्याला विसरून कसे चालेल? आणि मौनही एवढ्यासाठीच. ईश्वराची प्रार्थना करून म्हणावे, हे ईश्वरा, आजपासून तू आम्हाला आमच्या जबाबदारीची नेहमी

जाणीव करून देत जा. कारण आपणाला सत्ता मिळाल्यानंतर आपण वैभवात गुरफटले जाऊ नये, तसेच मनात कोणत्याही प्रकारची घमेंड येता कामा नये. आजपासून आपल्याला अधिकाधिक नम्र बनावयाचे आहे."

बापूंचा चेहरा गंभीर होता. बापूजींनी अर्ध्या तासात कोणाला कल्पना येणार नाही असे वातावरण उत्पन्न केले, तरीसुद्धा त्यांच्या चेहऱ्यावर आपण काही केले अशा तऱ्हेच्या गर्वाची बिलकूल जाणीव नव्हती. ते म्हणत की, "एकटा माणूस काय करील? तुम्ही सगळे माझे अभिनंदन कसले करता? माझ्या मदतीला तुम्ही सर्व होता म्हणून हे काम झाले."

बापू व आम्ही सर्वांनी उपवास व सूतकताईचा कार्यक्रम ठेवला होता. त्या दिवशी तेथले सर्व प्रधान बापूंच्या पाया पडायला आले. त्यांना उद्देशून बापू म्हणाले:

"हे बघा, आजपासून तुम्ही काटेरी मुकुट धारण करीत आहात. तुम्ही आजपर्यंत जेवढा साधेपणा ठेवलात तेवढाच साधेपणा सत्ता मिळाल्यानंतरही ठेवा. मुळीच गर्व येऊ देऊ नका. कारण सत्तेची खुर्ची फार खराब असते. वैभवात गुरफटू नका. सत्तेच्या व वैभवाच्या मोहजालात सापडू नका. तुम्हाला साधेपणाचा, नम्रतेचा, अहिंसेचा व सहनशीलतेचा धडा प्रजेला द्यावयाचा आहे. खेड्यांचा उद्धार करावयाचा आहे. गरीबांचा उद्धार करावयाचा आहे. सत्य कधीही सोडू नका. तुमची खरीखुरी परीक्षा आताच आहे. इंग्रजांच्या काळात तुमची एक प्रकारे परीक्षा नव्हती व होतीही. पण आजपासून अखंड परीक्षाच परीक्षा आहे. त्यात ईश्वर तुम्हाला संपूर्ण यश देवो."

गेल्या वर्षीच्या १५ ऑगस्ट रोजी शुक्रवार होता. बापू पुन्हा अशी शिकवण द्यायला का राहिले नाहीत? ते आपले काम मुळीच गर्व न करता पुरे करून आपल्या भविष्यवाणीप्रमाणे शुक्रवारीच हिंदूचे भक्ष्य बनले. त्यांनी त्या दिवशी सांगितलेली वचने आज पुन्हा लक्षात आणून घेऊ. त्याप्रमाणे वागण्याची शक्ती ईश्वर आपल्याला देवो.

१५
बापूंचे जन्मदिवस

'बापूंचे जन्मदिवस' असा शब्द मी एवढ्यासाठी वापरला की बापूंचा जन्मदिवस तारखेप्रमाणे २ ऑक्टोबरला आणि तिथीप्रमाणे भाद्रपद वद्य द्वादशीला येतो. गेल्या वर्षी तारखेवरून जन्मदिवस प्रथम आला होता.

आज बापूंशिवायचे काळेकुट्ट अंधारे जन्मदिवस आले. पण बापूजींची त्या दिवशीची भविष्यवाणी होतीच की, "येत्या चरखाद्वादशीला एक तर हिंदुस्तान बदलून गेले असेल किंवा मी तरी असणार नाही." पण बापूंचे हे भविष्य खरे होईल अशी कोणाला कल्पना होती?

बिर्ला हाऊस, गुरुवार, ता. २-१०-'४७

साडे तीन वाजता प्रार्थनेसाठी उठलो. आम्ही नुकतेच कोठे उठलो होतो तेवढ्यात घरातील पुष्कळ स्त्री-पुरुष प्रार्थनेसाठी येऊन ठेपले होते. आम्ही सर्व हातपाय तोंड धुऊन एकामागून एक बापूजींच्या पाया पडलो. मी हसत हसत बापूंना म्हटले: "हा कुठला न्याय? आमचा जन्मदिवस असला म्हणजे आम्ही सर्वांच्या पाया पडतो; आणि येथे तर उलट तुमच्या जन्मदिवशी आम्हालाच तुमच्या पाया पडावे लागते."

बापू म्हणतात: "हो, महात्म्यासाठी नेहमी उलटा नियम असतो. तुम्ही सर्वांनी मला महात्मा करून टाकले आहे ना? मग खोटा महात्मा असलो तरी खुशाल असो! पण 'महात्मा' शब्द आला की झाले, असा आपला नियम आहे."

बापूजींना त्या सुमाराला खोकला, ताप, सर्दी वगैरे होते. खोकला तर असा जबर येई की पाहणाऱ्याला पाहावत नसे. तरीही बापूजी प्रार्थनेनंतर निजले नाहीत. आपले दररोजचे टपाल व 'हरिजनबंधू'साठी लेख लिहिण्याच्या कामाला लागले.

हा खोकला अशा प्रकारचा होता की तो तीन आठवडे तरी राहावयाचाच.

पण डॉक्टरांनी खोकल्याचा त्रास कमी व्हावा म्हणून पेनिसिलिन घ्यायला सांगितले होते. त्यासाठी बापूंशी डॉक्टरांची हुजत चालली होती. बापू म्हणत: "माझे रामनाम कोठे गेले आहे? जर रामनाम हृदयगत झाले तर माझा खोकला उद्याच पळून जाईल. आणि तो तीन आठवडे चालला तर मी सगळ्या जगाला सांगायला तयार आहे की माझे रामनाम खोटे."

डॉक्टरांनी युक्तिवाद केला की, "सगळे खरे, पण विज्ञानाने एवढे सगळे शोध लावले त्यांना आपण खोटे कसे म्हणू शकणार? आपण हवे तेवढे हृदयगत रामनामच जपणारे आणा, मी त्यांना कॉलरा आणून दाखवितो."

बापू: "हा उद्धटपणा होय. विज्ञानाला अजून पुष्कळ शोधावयाचे बाकी आहे. आताशी कोठे सुरुवात झालीसे म्हणता येईल. पण जर रामनाम श्रद्धापूर्वक घेतले, तर जगात कोणी आजारी पडणारच नाही. जगातील माणसे इतकी विशुद्ध, निष्पाप झाली तर कोणाला काहीही होणार नाही अशी माझी खात्री आहे. पण तुमची चूक होते आहे. उद्या मला लिव्हर खायला सांगितले किंवा लिव्हर एक्स्ट्रेक्टची इंजेक्शने द्यायचे म्हटले तर काय मी बाहेरच्या देशात तयार झालेल्या वस्तू खाव्या? हिंदुस्तान आळशी आहे आणि त्यातूनही सर्वांत जास्त आळशी लोक असतील तर डॉक्टर लोक होत, कारण ते येथे काहीही तयार करू शकत नाहीत. परदेशी बनवलेल्या असतील त्याच वस्तू त्यांना खरेदी कराव्याशा वाटतात. कोण ही केविलवाणी स्थिती? हिंदुस्तान एक भिकारी देश! जेथे निसर्ग सर्व काही देतो, तरीही आम्हाला हात पसरण्याची पाळी येते! खरोखर, मनात विचार आला म्हणजे फार वाईट वाटते. जेव्हा त्याचे (हिंदुस्तानचे) नशीब उजळणार असेल तेव्हा उजळेल. आपण काय सांगणार? मी पुष्कळ केले. आता काही करायची इच्छा नाही. आता या जगातून लुप्त होऊन जावे, आणि ते रा...म रा...म म्हणत. रामनामात केवढे रहस्य भरलेले आहे ते मी कोणाला समजावून सांगू शकत नाही तेव्हा माझीच पात्रता तेवढी कमी. आज मी भट्टीमध्ये ('जेने राम राखेरे'... या भजनात म्हटल्याप्रमाणे) बसलेलो आहे. चारी बाजूंनी आग

भडकली आहे. तुम्ही सर्व डॉक्टर जसे विज्ञानाचे शोध करणारे आहात तसाच मी रामनामाचा शोधक आहे. ते शोधू शकलो तर ठीक, नाहीतर ते शोधता शोधता मरून जाईन. तुम्ही सगळे निरनिराळ्या प्रकारे मला आज दोन ऑक्टोबरच्या निमित्ताने प्रणाम करावयाला म्हणून आला आहात आणि समजूत घालीत आहात, हे तुमच्या प्रेमाचे सुंदर प्रतिक आहे. पण आता माझी इच्छा हीच की, एक मी तरी येत्या चरखा द्वादशीला ही आग पाहायला जिवंत राहू नये किंवा हिंदुस्तान तरी बदलून गेलेला असावा. तेव्हा मला दीर्घायुष्य मिळो अशी इच्छा करण्याऐवजी जशी मी प्रार्थना करीत आहे तशीच तुम्हीही करा."

अशा प्रकारे सकाळच्या प्रहरी–गेल्या वर्षी २ ऑक्टोबरला सकाळी साडेपाच वाजता-शब्द उच्चारले.

आपल्यात अशी समजूत आहे की नव्या वर्षी किंवा कोणतेही मंगल कार्य असता काही वाईट किंवा अशुभ बोलू नये, कोणावर रागावू नये, रडू नये वगैरे. आज माझ्या डायरीतील पू. बापूजींचे वरील शब्द वाचते तेव्हा त्या समजुतीत काहीतरी तथ्य आहे असे वाटू लागते. रामनामाचे शोधक रामनाम शोधता शोधताच गेले!

सात वाजता आम्ही बापूजींबरोबर फिरावयास गेलो. फिरत होतो तेवढ्यात एका इंग्रज गृहस्थाने बापूंचा फोटो काढायचा प्रयत्न केला. बापूजी त्याच्यावर नाराज झाले. एरव्हीदेखील फोटोग्राफर बापूजींना फार त्रास देत, म्हणून फोटोग्राफरची त्यांना एक प्रकारे चीड येत असे. बापू म्हणाले: "आज तर खास ईश्वराचे नाव घ्यावयाचे त्याऐवजी हे?"

इतक्यात कृपलानी, सुचेताबहेन वगैरे पुष्कळसे लोक, बापूजींना प्रणाम करावयाला आले. आम्ही उपवास केला होता. बापूजींनींही उपवास केला होता. मी म्हटले: "बापू, तुम्ही का म्हणून उपवास करणार?" बापू म्हणाले: "आज सूतरहाटाचा जन्मदिवस आहे. त्याच्या जन्मदिवशी उपवास करून आपण पवित्र होण्याचा प्रयत्न करीत पुन्हा पुन्हा प्रार्थना करावी की, हे देवा सूतरहाटा, तुझ्या संरक्षणाखाली आम्हाला ठेव. अशी प्रतिज्ञा आपण

करावी. म्हणून माझा उपास आहे. हा माझा जन्मदिवस आहे व मी तो

महत्वाचा मानतो म्हणून नाही."

फिरून आल्यावर मालीश स्नानादी नित्यक्रम. बापूजी साडेआठ वाजता आंघोळ करून बाहेर आले. मीराबहेननी बापूंच्या बैठकीसमोर कलात्मकतेने फुलांनी 'ॐ','हे राम' आणि क्रॉस केला होता. आम्ही सर्वांनी सुताचे हार घातले व पुन्हा पाया पडलो. मग लहानशी प्रार्थना केली. प्रार्थनेच्या वेळी जवाहरलालजी, इंदिरा गांधी, घनश्यामदास बिर्ला व त्यांचे कुटुंब, कनैयालाल मुनशी, सी.एच. भाभा, डॉ. जीवनराव महेता, सरदार वल्लभभाई वगैरे खूप खूप माणसांनी खोली भरून गेली होती. सर्व धर्माच्या प्रार्थनांनंतर मंडळी विखुरली आणि बापूजींना खोकला आला, तेव्हा एका गृहस्थांनी म्हटले:

"बापूजी, आपला खोकला अजून थांबला नाहीच."

बापू म्हणाले: "राम असेल तर थांबेल नाहीतर यातच निघून जाणे आवडेल. बाकी आता माझी सवाशे वर्षे जगायची इच्छा नाही. तुम्हीही आज हीच प्रार्थना करा की, हे ईश्वरा, एक या बुढ्याला असल्या परिस्थितीतून घेऊन तरी जा, नाहीतर हिंदुस्तानाला तरी सद्बुद्धी दे. मी ब्रिटिशांच्या बरोबर केलेल्या इतक्या लढ्यात कधी हताश झालो नव्हतो; पण आज घरची गोष्ट काय बोलावी? भाऊ भावाला मारायचा प्रयत्न करीत आहे, हे पाहायला जिवंत राहायची माझी इच्छा नाही." ही सर्व मंडळी दहा वाजता गेली आणि बापूजींना प्रणाम करायला येणाऱ्या लोकांची गर्दी वाढू लागली. श्री. गाडगीळ, देवदास गांधी व त्यांचे कुटुंब, भटनागर, डॉ. जीवराज महेता, सर दातारसिंह, आर्थर मूर, शण्मुखम् चेट्टी. पुन्हा ११.४० वाजता सरदार, मणिबहेन, गणेशदत्त, प्रो. अब्दुल मजीद, ब्रह्मदेशाचे हाय कमिशनर एच.एल.ए. आँग आणि चीनचे हाय कमिशनर डॉ. एम्. आँग सू आले. आपापल्या मुख्य प्रधानांची पत्रे व फळे घेऊन ते आले होते. या सगळ्यातून मोकळे होऊन बापूजींना कसाबसा १२.३० वाजता आराम करता आला. पंधरा मिनिटे

पडले असतील तो पुन्हा दर्शनार्थी लोक येऊ लागले. २ ते ३ एक तास समूह सूतकताई. ४.१० ला लेडी माउन्टबॅटन आल्या, ४.३५ ला परत गेल्या. त्या गेल्यावर हुमायुन कबीर, श्रीधराणी, फ्रान्सचे एम्. लॉजियर आणि त्यांच्या पत्नीही आल्या.

बापूजींच्या पायापाशी रुपयांची तर रासच झाली होती. कित्येक स्त्रिया आपले दागिनेही वाहून गेल्या होत्या.

अशा प्रकारे २ ऑक्टोबरचा सबंध दिवस खूप खूप आनंदात गेला. रात्री रेडियोचा सुंदर कार्यक्रम होता. मी बापूजींना म्हणाले: "त्यात काय ऐकायचे आहे? ती रेडियोतील भजने ऐकण्यापेक्षा सूतरहाटाचे संगीत का नाही ऐकू?" जवळजवळ हजाराहून जास्त अभिनंदनपर तारा देशविदेशातून आल्या होत्या.

चरखा द्वादशीच्या दिवशी म्हणजे भाद्रपद वद्य द्वादशीच्या दिवशी दिल्लीच्या गुजराती मंडळीनी एकत्र होऊन एक फंड गोळा केला होता. बापूजींची तब्येत बरी नसल्यामुळे सरदार वल्लभभाई बापूंना म्हणाले:

"असा जोराचा खोकला येतो आहे आणि कशाला तुम्ही गुजरात्यांच्या सभेला जायचे कबूल केले? पण तुम्ही असे लोभी आहा की अमुक जागी पैसा मिळेल असे कळले तर मरालया टेकला असला तरी जाल. असे फंड होतील गोळा, तेथे असे खोक्खोक् करीत जायची काय जरूर? पण तुम्ही माझे ऐकणार नाही." खूप हंशा पिकला. सरदार व बापू यांचा असा गोड संबंध होताच.

सभेत कित्येक लोकांनी सरदारांना काहीतरी बोलायला सांगितले तेव्हा त्यांनी आणखी विनोद केला: "आज माझा थोडाच वाढदिवस आहे? तुम्ही पैसे जमवून या महात्म्याला देता, आणि मला का म्हणून बोलायला सांगता? पण बापू आहेत बनिया आणि बनिया लोभी असायचाच. एवढा जबर खोकला व अशक्तपणा असूनही तुम्हाला लुबाडायची शक्ती मात्र त्यांच्यात आहे!" (खूपच हशा पिकला.) "पण आता त्यांना आराम घेऊ द्या एवढीच माझी विनंती आहे."

बापूंनी सूतरहाटाचा अधिकाधिक झपाट्याने प्रचार करण्याची आठवण केली.

असे हे दोन्ही दिवस जितके झगझगीत प्रकाशात साजरे झाले तेवढ्याच अंधारात या वर्षीचे ते दिवस आपण साजरे करणार. अंधारातही पणतीची वात अपूर्व प्रकाश देते व तेवढ्यावरच आपण संतोष मानतो. त्याचप्रमाणे बापूजींच्या मागे बापूजींच्या आठवणी पुन्हा पुन्हा काढून तसे आपण वागलो तर त्या प्रकाश देणारच व त्यावरच आपण संतोष मानावा. त्यांची दररोजची आवडती प्रार्थना करूया व त्यांना प्रणाम करूया:

"ईश्वर अल्ला तेरे नाम सबको सन्मति दे भगवान्."

बापूंनी गेल्या चरखाद्वादशीला म्हटले होते की, "हिंदुस्तान तरी शुद्ध बनेल किंवा मी तरी नसेन" तशीच प्रार्थना ईश्वराला व बापूंना पुन्हा करूया की, आम्हाला आजपासून खरा मार्ग दाखवा, आणि 'चुकलो तेथून पुन्हा मोजू या' या म्हणीप्रमाणे आमचा संकल्प लक्षात घ्या व आमच्या पापांकडे पाहू नका.